सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर मंगळवार, दि. १० जून २०२५ वर्ष - तिसरे अंक ६९ पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# पीओपी गणेश मूर्तींवरील बंदी उठवली; हायकोर्टाचा महत्त्वपूर्ण निर्णय

## मूर्तिकार अन् मंडळांना मोठा दिलासा

मुंबई : गणेशभक्तांसाठी आणि मूर्तिकारांसाठी अतिशय आनंदाची बातमी आहे. गणेशोत्सवआधी (सरपशीर्हेीर्रां २०२५) मुंबई उच्च न्यायालयाने (र्चीीलरळ क्ळसह उेीीं) महत्वाचा निर्णय दिला आहे. पीओपी (प्लास्टर ऑफ पॅरिस) गणेश मूर्तींवरील बंदी आता उठवण्यात आली आहे. या निर्णयामुळे मूर्तिकार आणि गणेशोत्सव मंडळांमध्ये समाधानाचं वातावरण निर्माण झालं आहे. मुंबई उच्च न्यायालयाने झजझ गणेश मूर्ती तयार करण्यावर आणि विक्री करण्यावर असलेली बंदी उठवली आहे. मात्र, या मूर्तींचे विसर्जन हे नैसर्गिक जलस्रोतांऐवजी कृत्रिम तलावांमध्येच करण्याची अट कायम राहणार आहे. या निर्णयावर न्यायालयात दोन्ही बाजूंनी सहमती दर्शवली आहे.

सरकारला समिती नेमण्याचे आदेश

न्यायालयाने राज्य सरकारला पीओपी मूर्तींच्या विसर्जनासाठी कोणत्या उपाययोजना केल्या जातील, यासाठी तीन आठवड्यांच्या आत एक समिती नेमून त्याविषयी सविस्तर आणि सखोल माहिती न्यायालयासमोर सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. या निर्णयानंतर आता घरगुती गणपतीसाठी बनवलेल्या छोट्या पीओपी गणेश मूर्ती साकारण्यास आणि गणेशोत्सव मंडळांमध्येही अशा मूर्ती विराजमान करण्यास कोणताही अडथळा राहिलेला नाही. मात्र, पर्यावरणपूरक विसर्जनाच्या अटींचे पालन अनिवार्य राहील. या निर्णयामुळे अनेक मूर्तिकारांना दिलासा मिळाला आहे.

न्यायालयात नेमकं काय घडलं?

मुख्य न्यायाधीश आलोक आराधे आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठाने सांगितले की, ते कोणत्याही पीओपी मूर्तीचे नैसर्गिक जलसाठ्यांमध्ये विसर्जन करण्यास परवानगी देणार नाही.





मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे की ते कोणत्याही परिस्थितीत नैसर्गिक जलसाठ्यांमध्ये कोणत्याही झजझ मूर्तीचे विसर्जन करण्यास परवानगी देणार नाही.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (सीपीसीबी) तज्ञ समितीने शिफारस केली आहे की, पीओपी मूर्ती तयार करता येतील. परंतु नैसर्गिक जलसाठ्यात विसर्जित करता येणार नाहीत. सीपीसीबी समितीने असे म्हटले आहे की, अशा मूर्ती फक्त कृत्रिम जलसाठ्यात विसर्जित केल्या जाऊ शकतात.

सुनावणी दरम्यान मोठ्या मूर्तींच्या विसर्जनाबाबत एकमेव मुद्दा समोर आला.

न्या. मारणे यांनी मंडळांना दरवर्षी एक मूर्ती बनवून ती सुरू ठेवण्यास सांगितले जाऊ शकते का? असा सवाल उपस्थित केला.

पीओपी बनवलेल्या मूर्तींच्या विसर्जनाबाबत आता राज्य सरकारला विवेकबुद्धी वापरावी लागेल आणि निर्णय घ्यावा लागेल, असे खंडपीठाने म्हटले आहे.

राज्याचे महाधिवक्ता डॉ. बिरेंद्र सराफ यांनी मोठ्या मूर्तींसाठी काही सवलत मागितली आहे. ते म्हणाले की, या मोठ्या मूर्ती (२० फूट आणि त्याहून अधिक उंचीच्या) आपल्या संस्कृतीचा भाग बनल्या आहेत.

सीजे आराधे यांनी म्हटले की, आम्हाला खात्री आहे की, कोणत्याही पीओपी मूर्तीचे नैसर्गिक जलसाठ्यात विसर्जन करण्याची परवानगी दिली जाणार नाही. तुम्ही कृत्रिम जलसाठे तयार करू शकता आणि तेथे पीओपी मूर्तींचे विसर्जन करू शकता.

एजी सराफ यांनी म्हटले की, जर मंडळांनी कायमस्वरूपी त्याच मूर्तीचा वापर केला तर राज्य म्हणून आम्ही त्यात अडथळा आणणार नाही. यावर सीजे आराधे यांनी हो, तुम्ही निर्णय घ्या, असे म्हटले आहे.

पीओपी विरुद्ध शाडूच्या मूर्तीचा वाद

दरम्यान, प्लास्टर ऑफ पॅरिसपासून (पीओपी) तयार केलेल्या मूर्ती विरुद्ध शाडूच्या मूर्ती हा वाद सध्या सुरू आहे. विशिष्ट परिस्थितीत पीओपीला परवानगी देणे शक्य असल्याचा दावा राज्य सरकारने याआधी उच्च न्यायालयात केला आहे. समितीच्या शिफारशींचा अहवाल निर्णयासाठी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे (सीपीसीबी) पाठवल्याचेही न्यायालयात सांगण्यात आले. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या (पीओपी) वापरावरील बंदी संदर्भात राज्य सरकारनं केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे (सीपीसीबी) समितीचा अहवाल ५ मे रोजी पाठवला आहे.

# सिंहस्थ २०२६ च्या पार्श्वभूमीवर नाशिकमध्ये विशेष प्राधिकरण स्थापनेची तयारी

## प्राधिकरणाच्या अध्यक्षपदी विभागीय आयुक्तासह २१ सदस्यांची नियुक्ती, राज्यपालांच्या मंजुरीनंतर कामांना गती

नाशिक: नाशिकमध्ये होणार्या सिंहस्थ कुंभमेळाच्या पार्श्वभूमीवर विशेष प्राधिकरणाची घोषणा करण्यात आली असून, या प्राधिकरणाच्या अध्यक्षपदी विभागीय आयुक्तासह २१ सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कुंभमेळा आयुक्त हे या प्राधिकरणाचे सदस्य सचिव म्हणून राहणार आहेत. या प्राधिकरणाची स्थापना करण्याची अधिसूचना सोमवारी प्रकाशित करण्यात आली असली, तरी त्यावर राज्यपाल राधाकृष्णन यांनी दि. ३ जून रोजीच स्वाक्षरी केली आहे. राज्यपालांच्या सहीने प्राधिकरणाची अधिसूचना राजपत्रात प्रकाशित करण्यात आलेली आहे.



उपाध्यक्षपदी जिल्हाधिकारी

या प्राधिकरणामध्ये एकूण २२ सदस्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. नाशिकचे विभागीय आयुक्त हे अध्यक्ष म्हणून राहणार आहेत, तर नाशिकचे जिल्हाधिकारी आणि नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक हे उपाध्यक्ष म्हणून राहणार आहेत.

या प्राधिकरणाच्या सदस्य सचिवांमध्ये अहमदनगरचे जिल्हाधिकारी यांच्यासह नाशिक विकास प्राधिकरणाचे आयुक्त, पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक, नाशिक महानगरपालिकेचे आयुक्त, नाशिकच्या जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, त्र्यंबकेश्वर नगरपालिकेचे मुख्याधिकारी, नियोजन विभागाचे उपायुक्त, नियोजन, विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र, राज्य रस्ते परिवहन महामंडळ, आरोग्य विभागाचे उपसंचालक, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मुख्य अभियंता, विद्युत मंडळाचे अधीक्षक अभियंता, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी, सहसंचालक (लेखा व कोषागारे), नाशिक नगररचना विभाग सहसंचालक हे पदसिद्ध सदस्य असतील, तर कुंभमेळा आयुक्त हे सदस्य सचिव असणार आहे. या प्राधिकरणाच्या बैठका दर तीन महिन्यांनी होणार आहेत. या बैठकीच्या संदर्भात अध्यक्ष हे सर्व निर्णय घेतील, तसेच दोनतृतीयांश बहुमत नसेल, तर पुढील २४ तासांमध्ये बैठक घेण्यासंदर्भातला निर्णय हे अध्यक्ष घेऊ शकतात, असे स्पष्ट करण्यात आले आहे. अध्यक्षांना सल्ला घेण्यासाठी म्हणून कोणाला बोलवायचे व कोणाला नाही याबाबतचा निर्णयदेखील अध्यक्ष घेऊ शकतात. कुंभमेळ्यासाठी तयार करण्यात आलेली विकास कामे किंवा इतर काही बाबींचे पुढे काय करायचे, याचा निर्णय प्राधिकरणाने घ्यायचा आहे, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

# सोन्याच्या दरात घट चांदीच्या दरात मात्र वाढ

मुंबई / प्रतिनिधी: आज पुन्हा एकदा सोन्याच्या दरात घट झाली आहे. सतत चार दिवस सातत्यपूर्ण सोन्याच्या दरात भाववाढ झाल्यानंतर शनिवारी सोन्याच्या दरात घट झाली होती. आज तोच ट्रेंड पुन्हा राहत सराफा बाजारात सोन्यात घट दिसून आली आहे. ' गुड रिटर्न्स ' संकेतस्थळावरील माहितीनुसार,सोन्याच्या २४ कॅरेट प्रति तोळे किंमतीत २८ रूपयाने घट झाली आहे. त्यामुळे सोन्याचे दर प्रति ग्रॅम ९७६९ रूपये झाले आहेत तर प्रति तोळा किंमत ९७६६९० रुपये पातळीवर पोहोचली आहे.

२२ कॅरेट प्रति ग्रॅम सोन्याची किंमत २५ रूपयांनी घसरत ८९५५ रुपयावर पोहोचली आहे तर प्रति तोळा किंमत ८९५५० रूपयांवर पोहोचली आहे. १८ कॅरेट प्रति ग्रॅम किंमत २१ रूपयांनी घसरून ८३२७ रूपयांवर पोहोचली आहे तर प्रति तोळा किंमत ७३२७० रुपयांवर पोहोचली आहे.

मुंबईसह बहुतांश सगळ्या महानगरात २४ कॅरेट प्रति ग्रॅम किंमत ९७६९ रूपयांवर पोहोचली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातील परिस्थितीत सुधारणा होत असताना बाजारातील रूपयांची किंमत वधारतानाच सोन्याच्या मागणीत सतत चढत्या दराने घट होत होती. त्याची परिणिती म्हणून यापूर्वी नफा बुकिंग म्हणून सोन्याच्या संचयात होणारी वाढही कमी झाली. चीन अमेरिका यांच्यातील व्यापार मतभेदात काही अंशी घट झाल्याने त्याचा सकारात्मक परिणाम आशियाई शेअर बाजारात पाहायला मिळाला होता. एमसीएक्सवर सोन्याचा निर्देशांकात ०.५१% घट झाली आहे. त्यामुळे एमसीएक्सवर सोन्याची दर पातळीही कमी होत ९६५३७.०० पातळीवर पोहोचली आहे. युएस गोल्ड फ्युचर निर्देशांकात ०.२३ टक्क्याने घसरण दुपारपर्यंत झाली होती.

शनिवार प्रमाणे चांदीच्या दरात किरकोळ वाढ कायम आहे. प्रति ग्रॅम चांदीची किंमत १०८ रूपयांवर तर एक किलो चांदीची किंमत १००० रूपयांनी वाढत १०८०००० रूपयांवर पोहोचली आहे. चांदीच्या एमसीएक्स निर्देशांकात ०.०७ टक्क्यांनी वाढ होत किंमत पातळी १०५५३२.०० रुपयांवर पोहोचली. चांदीच्या मागणीत सोन्याच्या तुलनेत वाढ झाल्याने बाजारात तुलनात्मकदृष्ट्या चांदीसाठी संमिश्र प्रतिसाद मिळत आहे.


# वारकऱ्यांना सुलभ दर्शनासाठी तुळशीपूजा बंद! वारकरी संप्रदायाची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

सोलापूर : श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांना दर्शन रांगेत ६ ते ७ तास ताटकळत उभे राहावे लागले होते. यामुळे भाविकांनी मंदिर समिती विरोधात नाराजी व्यक्त करत घोषणाबाजी केली होती. तसेच वारकरी संप्रदायाने भाविकांच्या दर्शनात अडथळा आणणारी तुळशीपूजा बंद करण्याची मागणी केली होती. याची दखल घेऊन श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीने प्रक्षाळपुजेपर्यंत ८० तुळशी पूजा बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे भाविकांना सुलभ व जलद दर्शन मिळणार आहे.

भाविकांची नाराजी

श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी राज्यभरातून येणार्या भाविकांना सुविधा चांगल्या देण्यात याव्यात. यासाठी शासनाने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीची स्थापना केली आहे. मात्र, श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समिती भाविकांच्या सुविधांकडे दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत आहे. व्हिआयपी दर्शन, तुळशीपूजेला दर्शन बंद, यामुळे भाविकांना दर्शन रांगेत तासनतास ताटकळत उभे राहावे लागत आहे. त्यामुळे भाविकांना श्री विठ्ठल रुक्मिणीचे जलद दर्शन मिळत नसल्याने नाराजी व्यक्त केली जात आहे.





केवळ १० तुळशीपूजा सुरु राहणार

मागील चार दिवसापुर्वी दर्शनासाठी आलेल्या भाविकांना ६ ते ७ तास दर्शन रांगेत ताटकळत उभे राहावे लागले. यामुळे भाविकातून तीव्र संताप व्यक्त घोषणाबाजी करण्यात आली. तुळशी पूजेमुळे भाविकांना दर्शन रांगेत जास्त वेळ उभे राहावे लागले. म्हणून मंदिर समितीने विठ्ठलाची तुळशीपूजा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. दररोज विठ्ठलाच्या ९० तुळशी पूजा होत होत्या. आता ८० पूजा रद्द करण्यात आल्या आहेत. केवळ १० तुळशीपूजा सुरु राहणार आहेत. वारकर्यांची गर्दी वाढली, गरज भासली तर त्या १० तुळशीपूजा देखील बंद करुन जास्तीत जास्त वारकर्यांना दर्शन देण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे मंदिर समितीकडून सांगण्यात आले.

दरम्यान, पुढच्या महिन्यात आषाढी यात्रा आहे. या निमित्ताने लाखो भाविक दर्शनासाठी पंढरपुरात दाखल होत असतात. शिवाय पायी दिंड्या देखील पंढरपूरमध्ये येत असतात. यामुळे भाविकांच्या आता किमान पुढील २ महिने भाविकांची गर्दी अधिक राहणार आहे. या अनुषंगाने आलेल्या भाविकांना लवकर दर्शन घेता यावे; यासाठी नित्य तुळशी पूजा बंद करण्याची मागणी होत आहे. यावर आता मंदिर समिती काय निर्णय घेते हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

# वन्य प्राण्यांची तस्करी करणाऱ्यास अटक; दोन घोरपडी जप्त

**तभा वृतसेवा**
**नांदेड , दि.०९ जून -**

वन्य प्राण्यांची तस्करी करणाऱ्या एकास ग्रामीण पोलीसाच्या पथकाने अटक केली असून त्याच्याकडून पाच किलो वजनाची व तीन किलो वजनाची अशा दोन घोरपडी जप्त केल्या आहेत.

ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक ओमकांत चिंचोळकर यांना वन्य प्राण्यांची तस्करी, विक्री होत असल्याची मिळालेल्या गोपनिय माहितीच्या आधारे चंदासिंग कॉर्नर येथे पोलीस गस्त घालत असतांना एक इसम संशयीतरित्या फिरत असल्याचे दिसून आले. त्याचे नांव दशरथ धोतरे रा. काकांडी असे आहे. त्याला हटकवून त्याची अंकझडती घेतली असता त्याच्या जवळ असलेल्या पिशवीत एक पाच किली वजनाची व तीन किलो वजनाची घोरपड आढळून आली. पोलीसांनी सदरच्या व्यक्ती अटक करून त्याच्याकडेल दोन्ही घोरपडी जप्त करून त्या वन्य परिक्षेत्र अधिकाऱ्याकडे सुपूर्द करण्यात आल्या. त्याच्यावर कारवाई करण्यात आली असल्याची ग्रामीण पोलीसांनी सांगीतले.



दुसऱ्या एका कारवाईत ग्रामीण पोलीसांनी सोशल मिडीयावर हत्यारासह फोटो ठेवून दहशत निर्माण करणाऱ्या दोन अल्पवयीन बालकांना तुप्पा येथून अटक केली आहे. त्यांच्याकडून एक लोखंडी तलवार, लोखंडी खंजर असा एकुण २ हजार ५०० रूपयांचा मुदेमाल जप्त केला आहे.

**चोरीचा गुन्हा दोन तासात उघड**

रहिमपूर दुध डेअरीजवळ एका उघड्या असलेल्या घरातून १ लाख ७१ हजार रूपयांचा ऐवज चोरून नेला आहे. काल सायंकाळी ही घटना घडीली आहे.

शेख मौला शेख मोहम्मद रा. रहिमपूर हे अनावधानाने आपल्या घराला कुलूप न लावता बाहेर गेले. ही संधी साधून चोरट्यांनी त्यांच्या उघड्या धरातून गादीखाली ठेवलेले १४ ग्राम सोन्याचे दागिणे, ७ ग्राम सोन्याचे गंठन आणि मंगळसुत्र असा १ लाख ७१ हजार रूपयांचा ऐवज चोरून लंपास केला. घरी आल्यानंतर शेख मौला यांना हा प्रकार समजला. त्यांनी लगेच ग्रामीण पोलीस ठाणे गाठून रितसर तक्रार नोंदवली. ग्रामीण पोलीसांनी अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा दाखल केला आहे.



# जिल्ह्यातील अंगणवाड्यांचा कायापालट करणारे गणेश वाघ यांची बदली

## व्ही. एस. बोराटे यांनी स्विकारला महिला, बालकल्याणचा पदभार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ जून**

हिंगोली जिल्ह्यातील १००० अंगणवाड्यांपैकी तीनशे पेक्ष अधिक अंगणवाड्या लोकसहभागातून डिजीटल करून घेणारे तसेच अंगणवाडीतील दुरचित्रवाणी संचाद्वारे बालकांना ऑनलाईन पूर्व प्राथमिक अभ्यासक्रमाचे शिक्षण सुरू करणारे आणि अंगणवाड्यातून तब्बल ७८ हजार विविध उपक्रम राबवत राज्यात तिसरा क्रमांक आणणारे उपमुख्य कार्यकारी अधिकारी गणेश वाघ यांची नुकतीच नांदेड येथे बदली झाली असून त्यांचा पदभार व्ही एस बोराटे यांनी घेतला आहे.

जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी गणेश वाघ यांनी जिल्ह्यातील अंगणवाड्यांमध्ये अमुलाग्र बदल केले आहेत. जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी जिल्ह्यातील १ हजार अंगणवाड्यांचा चेहरा मोहरा बदलून टाकला. सर्वप्रथम या अंगणवाड्यांची एकसमान रंगरंगोटी करून भिंती बोलक्या करून केल्या. त्यानंतर लोकसहभागातून तीनशेपेक्षा जास्त अंगणवाड्या डिजीटल करून घेतल्या. या अंगणवाड्यांमध्ये दुरचित्रवाणी संच मिळाल्यामुळे विद्यार्थी ऑनलाईन पूर्व प्राथमिक अभ्यासक्रमाचे शिक्षण धेऊन लागले आहेत.

अंगणवाड्यामधून विद्यार्थ्यांना दिला जाणारा पोषण आ-हार शिजवतांना अंगणवाडी कर्मचाऱ्यांना तसेच बालकांना धुराचा त्रास होत होता. त्यातून उपमुख्य कार्यकारी अधिकारी वाघ यांनी धुरमुक्त अंगणवाडी हा उपक्रम हाती घेऊन सर्व अंगणवाड्यांना गॅस सिलेंडर उपलब्ध करून दिले. त्यामुळे आता अंगणवाडीतील पोषण आहार गॅस सिलेंडरवर शिजवला जात आहे. पोषण महाअभियानात मागील वर्षात भरीव कामगिरी केली आहे. तर यावर्षी मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील १ हजार अंगणवाड्यामधून तब्बल ७८ हजार विविध उपक्रम राबवित राज्यात तिसरा क्रमांक पटकाविला आहे. यामध्ये प्रामुख्याने पाककृती स्पर्धा, पोषण आहार जनजागृती, बालकांचा पूरक पोषण आहार अशा उपक्रमांचा समावेश आहे. याशिवाय जिल्हा नियोजन समितीकडून महिला बालकल्याण विभागाला जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून धेत नादुरूस्त झालेल्या अंगणवाड्यांची दुरूस्ती करून घेतली. तसेच शासन स्तरावर वेळोवेळी पाठपुरावा करून नवीन अंगणवाडीमध्ये नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणारा हिगोली राज्यासाठी आदर्शवत ठरला आहे.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी गणेश वाघ यांची नांदेड येथे बदली झाली असून विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दि ९ जून रोजी त्यांचा सत्कार करीत त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. त्यांच्याजागी आता नांदेड येथून व्ही एस बोराटे हे रूजू झाले असून त्यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला.

# पोलिस विभागाच्यावतीने हिंगोलीसह ४ जिल्ह्यात कारवाया

## ७.७५ लाखांचा मुद्देमाल सापडला



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ जून**

हिंगोलीसह परभणी, लातूर आणि नांदेड जिल्ह्यात पोलिस विभागाने अवैध व्यवसाय विरोधी अभियान २ अंतर्गत मागील आठवड्यात विविध ठिकाणी छापे टाकून तब्बल ७.७५ लाख रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. यामध्ये १३ हजार लिटर गावठी दारू गाळपासाठी लागणारे रसायन, ३ हजार देशी दारूच्या बाटल्या, ३ हजार लिटर गावठी दारूचा समावेश आहे.

हिंगोलीसह चार जिल्ह्यातून अवैध व्यवसाय विरोधी अभियान २ राबवण्यास सुरूवात झाली आहे. नांदेड परिक्षेत्राचे उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, परभणीचे पोलिस अध-ीक्षक रवींद्रसिंह परदेशी, नांदेडचे पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार, लातूरचे पोलिस अधीक्षक सोमय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान राबविले जात आहे.

या अभियानामध्ये मागील आठवड्यात १६१ अधिकारी व ६९९ पोलिस कर्मचाऱ्यांची नियुक्ती करून त्यांच्यामार्फत अवैध व्यवसायाची माहीती धेऊन छापासत्र सुरू करण्यात आले. यामध्ये हिंगोली जिल्ह्यात २७ ठिकाणी छापे टाकून गुन्हे दाखल करून ३७ हजार ९७० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. नांदेड जिल्ह्यात ११५ ठिकाणी छापे टाकून ११५ जणांवर गुन्हे दाखल करून ४.२६ लाखांचा मुद्देमाल जप्त केला. परभणी जिल्ह्यात ४६ ठिकाणी छापे टाकून ४६ जणांवर गुन्हे दाखल करून १.७२ लाखांचा मुद्देमाल जप्त केला. लातूर जिल्ह्यात ६७ ठिकाणी छापे टाकून ६७ जणांवर गुन्हे दाखल करून त्यांच्याकडून १.३८ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या अभियानात नागरिकांनीही त्यांच्या भागातील अवैध व्यवसायाची माहीती देऊन या मोहीमेला सहकार्य करण्याचे आव-ाहन पोलिस विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.

# क्रांतीसूर्य बिरसा मुंडा यांच्या स्मृतीदिनानिमित्त अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ जून**



शहरातील बांगर नगर भागातील क्रांतीसूर्य बिरसा मुंडा चौकात क्रांतीसूर्य बिरसा मुंडा यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण, माजी आ. डॉ संतोष टारफे, माजी जि प सदस्य डॉ सतीश पाचपूते, आदिवासी संघटनेचे जिल्हाध्यक्ष दत्ता नांदे, डॉ ढाकरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांच्याहस्ते क्रांतीसूर्य बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. ९ जून हा क्रांतीसूर्य बिरसा मुंडा यांचा शहीद दिन म्हणून साजरा करण्यात येतो. यावेळी बोलतांना माजी आ. डॉ टारफे यांनी क्रांतीसूर्य बिरसा मुंडा यांच्या कार्याचा गौरव करतांना देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी बिरसा मुंडा यांनी बलिदान दिले. आदिवासी समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी अविरत काम केले. उलगुलान जिंदाबाद, अमर रहे अमर रहे बिरसा मुंडा अमर रहे अशी घोषणाबाजी यावेळी करीत अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाला आंध आदिवासी संघटना, युवा आदिवासी संघाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**हिंगोली– भाजपचे मराठवाडा संयोजक किरण पाटील हे हिंगोली दौऱ्यावर असतांना आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्या पाठपुराव्यामुळे येथील जलेश्वर तलावाच्या सुशोभिकरण कामाची पाहणी त्यांनी केली. यावेळी आ. मुटकुळे यांच्या कार्याचे पाटील यांनी कौतुक केले. यावेळी जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, नारायण खेडेकर, सचिन शिंदे, रजनीश पुरोहीत, गुत्तेदार मयूर कयाल आदी. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### श्री शिवप्रतिष्ठानच्यावतीने शिवराज्यभिषेक सोहळा



हिंगोली– श्री शिव प्रतिष्ठान हिंदुस्थानतर्फे येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून शिवराज्यभिषेक सोहळा साजरा करण्यात आला. यावेळी विधिवत पूजा चर्चा करून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास दुग्धाभिषेक करण्यात आला. यावेळी जिल्हाप्रमुख विजय शिंदे राजे, सावरमल अग्रवाल, राजेंद्र हलवाई, कृष्णा जगताप, दशरथ पवार, पिंटू गोरे, ओंकार गलांडे, बजरंग कदम, योगेश, डॉ. राम हराळ, राम पाठक, मनीष गिरी, गजानन जगताप, रवी पोले, महेश कुलकर्णी, पांडुरंग पोले, निखिल शिंदे, विश्वास बिरगड, दिपक शिंदे आदींसह शिवप्रेमींची उपस्थिती होती.

### दिग्विजय बायस यांची उपाध्याक्षपदी निवड

हिंगोली– औंढा शहरातील भाजपाचे कार्यकर्ते दिग्विजय बायस यांची नुकतीच भाजपा शिक्षक आघाडी जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आलेली आहे. भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनानुसार शिक्षक आघाडीचे जिल्हाध्यक्ष प्रा.गजानन कुटे यांनी दिग्विजय बायस यांना नियुक्तीपत्र दिले आहे. दिग्विजय बायस यांची भाजपा शिक्षक आघाडी जिल्हा उपाध्यक्ष ग्रामीण व जिल्हा प्रसिद्धी प्रमुखपदी नियुक्ती केली असून त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी भाजपाचे पदाधिकारी उपस्थित होते.

### वारंवार जुगारांचे गुन्हे करणाऱ्यांना केले हद्दपार

हिंगोली– वसमत शहरात वारंवार जुगाराचे गुन्हे करणारे ज्ञानेश्वर योगाजी साखरे रा जवळा खंदारबन, शेख ईस्माईल शेख मन्सूर रा वसमत, शेख बबलू शेख पाशु रा जवाहर कॉलनी वसमत, सय्यद इमरान स. कलीम रा फिदा कॉलनी वसमत यांनी वसमत पोलिस ठाणे हद्दीत सन २०१९ ते २०२४ या कालावधीत ५० गुन्हे केलेले असून सदरचे इसम गुन्हेगारी प्रवृत्तीचे असून त्यांच्यावर वेळोवेळी दाखल असलेल्या गुन्ह्यांचा काही परिणाम झालेला नसून त्यांची गुन्हेगारी प्रवृती दिवसेंदिवस वाढत असल्याबाबत उपविभागीय पोलिस अधिकारी राजकुमार केंद्रे व पोनि सुधीर वाघ यांच्या मार्गदर्शनानुसार उपनि शिवाजी बोंडले गुन्ह्यांचा अभिलेख हस्तगत करून हद्दपारीचा प्रस्ताव पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांचेकडे सादर केला. पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी चारही इसमांना हिंगोली जिल्ह्याचे हद्दीतून तीन महिने कालावधी पर्यंत निघून जाण्याचे आदेश पारीत केले आहे. चारही आरोपींना हद्दीतून कायदेशीर हद्दपार करण्यात आले आहे.

# निपूण हिंगोली अंतर्गत जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला शिक्षण विभागाचा आढावा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ जून**



जिल्ह्यातील जिल्हा परिषद तसेच खाजगी अनुदानीत, विन-ाअनुदानीत शाळेतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढावी यासाठी निपूण हिंगोली उपक्रम राबविण्यात येत असून याअंतर्गत दि ९ जून रोजी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये शिक्षण विभागाची आढावा बैठक घेण्यात आली.

जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा वाढावा त्यांना त्यांच्या इयत्तेपर्यंतचे सर्व बेसिक ज्ञान मिळावे. तसेच भाषा, गणित आणि शास्त्र यांच्यासंदर्भातील संकल्पना स्पष्ट व्हाव्यात यासाठी राज्य शासनाने निपूण महाराष्ट्र उपक्रम सर्व माध्यमांच्या शाळांमधून राबविण्यास सुरूवात केली आहे. यासंदर्भात सोमवारी शिक्षण विभागाची आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी प्रशांत दिग्रसकर, प्राथमिकचे शिक्षणाधिकारी संदीप सोनटक्के यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी जिल्हाधिकारी गुप्ता यांनी तालुक्यातील हिंगोली, कळमनुरी, वसमत, औंढा नागनाथ, सेनगाव या पाचही तालुक्यातील गटशिक्षणाधिकारी तसेच केंद्र प्रमुखांची आढावा बैठक घेत सद्यस्थितीची माहीती घेतली. तसेच निपूण हिंगोली अंतर्गत विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी उपाययोजना करण्याचे आवाहन केले.

# प्रमाणित बियाणे वाटपात कोणताही घोटाळा झाला नाही– राजेंद्र कदम

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ जून**

प्रमाणित बियाणे वाटपात घोटाळा होत असल्याच्या अफवा पसरवल्या जात आहेत परंतु प्रमाणित बियाणे वाटपामध्ये कोणताही घोटाळा होत नसून पात्र शेतकऱ्यांना शासकी अनुदानात हे बियाणे उपलब्ध करून देण्यात येत असल्याचा खुलासा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम यांनी एका प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

राष्ट्रीय खाद्यतेल अभियान गळीत धान्य अंतर्गत हिंगोली जिल्ह्यात खरीप हंगाम २०२५ मध्ये सोयाबीन पिकाचे समुह निवडण्यात आलेले असून त्यासाठी सोयाबीन पिकाचे पाच वर्षाच्या आतील बियाण्याचे १०० टक्के अनुदानावर कमीत कमी ०.२० हेक्टर ते १ हेक्टर क्षेत्रासाठी लागणारे बियाणे वाटपाचा कार्यक्रम चालू असून त्यासाठी नोदणी केलेल्या पात्र लाभार्थ्यांना जास्तीत जास्त ७५ किलो बियाणे मंजूर असलयचे कृषी आयुक्तालय पुणे यांच्या नोंदणीकृत प्राप्त लाभार्थ्यांना सुचना प्राप्त आहेत. त्यासाठी महाबीज यंत्रणेकडून २२ किलो प्रति बॅग पॅकींग असलेले बियाणे देण्यात येत आहे. सोयाबीनची पेरणी बीबीएफ, टोकन तंत्रज्ञान द्वारे केल्यास उत्पादनामध्ये वाढ झाल्याचे दिसून आले आहे. आणि त्यासाठी प्रति एकरी २२ किलो बियाणे पुरेसे असते या उद्देशाने महाबीज यंत्रणेकडून २२ किलो प्रति बॅग बियाणे पॅकींग करण्यात आली आहे. तथापि लाभार्थ्यांना ७५ किलो बियाणे मंजूर झाले असल्यास २२ किलो पॅकींग मध्ये ७५ किलो बियाणे देणे शक्य होत नाही आणि प्रमाणित बियाणे असल्यास ते बॅग फोडून देता येत नाही म्हणून २२ किलोच्या तीन बॅग म्हणजे ६६ किलो बियाणे देण्याचे निश्चित करण्यात आले होते. जर शेतकऱ्यांना ७५ किलो बियाणे पाहीजे असल्यास त्यांनी ८८ किलो बियाणे घेऊन ७५ किलो बियाणे अनुदानीत व उर्वरित १३ किलो बियाणे विना अनुदानीत स्वखर्चाने घ्याचे लागणार आहे.

त्यामुळे संबंधीत प्रमाणित बियाणे वाटपामध्ये महाबीज यंत्रणेकडून आणि कृषी विभागाकडून कोणताही घोटाळा होत नसून सर्व शेतकऱ्यांनी याची नोंद घ्यावी तसेच शासकीय अनुदानीत बियाण्यांचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम यांनी केले आहे.

# जिथं कमी, तिथं आम्ही उपक्रमांतर्गत मातंग समाजातील दहावी, बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**तभा वृत्त सेवा**
**हिंगोली, ९ जून**



लहुजी साळवे कर्मचारी महासंघ शाखा हिंगोली व सकल मातंग समाज, हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमाने 'जिथं कमी, तिथे आम्ही' या उपक्रमांतर्गत इयत्ता दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा विश्रामगृह येथे पार पडला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. प्रा.ओमप्रकाश दरक, उपप्राचार्य ग्रामीण टेक्निकल अँड मॅनेजमेंट कॅम्पस विष्णुपुरी, नांदेड यांनी इयत्ता दहावी नंतर उपयुक्त असणाऱ्या विविध पदविका अभ्यासक्रमांची विद्यार्थ्यांना आ-ेळख करून दिली. लवकरात लवकर कौशल्यपूर्ण शिक्षण घेऊन स्वतःच्या पायावर उभे राहता येते. शिवाय कोणत्याही प्रकारची प्रवेशपरीक्षा न देता अभियांत्रिकी शाखेच्या द्वितीय वर्षात प्रवेशही मिळतो अशी माहिती दिली.

आदर्श कॉलेज येथील लोकप्रशासन विभाग प्रमुख डॉ. दयाराम मस्के हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उप-स्थित होते. विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीनुसार विद्याशाखा निवडाव्यात जेणेकरून त्यांना आवडीच्या अभ्यासक्रमातून इच्छित ध्येय साधता येणे सोपे जाईल, असे यशाचे इप्सीत विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबविले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी हृदयरोग तज्ञ डॉ. अमोल धुमाळ उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांच्या घव-घवीत यशाबद्दल शुभेच्छा देऊन उच्च शिक्षणाचे ध्येय मनात घेऊन अभ्यास करावा असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे प्रेम वानखेडे या विद्यार्थ्याने जीईई अॅडव्हान्स २३४ रँक ने उत्तीर्ण केली आणि एनडीएच्या परीक्षेत सुद्धा घवघवित यश मिळविले आहे. हे दुहेरी यश त्याने संपादन केल्याबद्दल त्याचा सहकुटुंब सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिथे कमी, तिथे आम्ही उपक्रमाचे अध्यक्ष आत्माराम गायकवाड यांनी केले. तर सूत्रसंचालन अनिलकुमार खंदारे यांनी केले. या कार्यक्रमास हरिभाऊ सोनवणे यांच्या तर्फे प्रोत्स-ाहनपर प्रथम आणि द्वितीय येणाऱ्या मुला, मुलीस बक्षीस वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते. कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष बबनराव शिखरे, लसाकम अध्यक्ष मानवतकर, अॅड.जे.पी.खंदारे, अॅड. मधुकर कांबळे, अॅड. दीपक रनबावळे, अॅड. रवींद्र साठे, अॅड. अशोक गायकवाड, सचिन आठवले, सुदाम गवळी, डॉ. रवी थोरात, प्रा. संजय जामठीकर, रवींद्र खंदारे, गंगाप्रसाद भिसे, द्वारकादास गायकवाड, भास्कर लांडगे, रामदास कांबळे, सुधीर आठवले, राधिकाताई चिंचोलीकर, भागवतराव डोंगरे, प्रमोद वैरागड, सुशील कसबे, नारायण बोरकर, श्याम कांबळे, माधव तलवारे, गणेश ढोके, दौलत खरात आणि गुणवंत विद्यार्थी कार्यक्रमास उपस्थित होते. रामदास कांबळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## ग्रीस्टॅक नोंदणी, शून्य प्रलंबितता कामे पूर्ण करा- जिल्हाधिकारी

छत्रपती संभाजीनगर, दि.९(जिमाका)– शेतकऱ्यांना फार्मर्स आयडी मिळवून देण्यासाठी ग्रीस्टॅक नोंदणी, शून्य प्रलंबितता ही कामे वेळेत पूर्ण करा, असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज सर्व यंत्रणेला दिले.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज सर्व तालुकास्तरीय यंत्रणांची आढावा बैठक घेतली. बैठकीस अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे, निवासी उपजिल्हाधिकारी संगिता राठोड जिल्हाधिकारी कार्यालयात उपस्थित होते. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकीत, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी आदी दुरदृष्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते. जिल्हाधिकारी स्वामी यांनी नागरिकांच्या तक्रारींचा आढावा घेतला. तसेच जलसमृद्ध गाव, स्मशानभुमी समस्या निवारण, शून्य प्रलंबितता, वृक्ष लागवड अभियान, ग्रीस्टॅक नोंदणी या उपक्रमांचा आढावा घेतला. १० जून अखेर सर्व कार्यालयांत शून्य प्रलंबितता करण्यात यावी. त्यासाठी प्रत्येक कार्यालय प्रमुखांनी प्रत्यक्ष खात्री करुन अहवाल द्यावा. जलसमृद्ध गाव अभियानात गावात करण्यात आलेले विहीर पुनर्भरण, बोअर पुनर्भरण, छतावरील पाण्याचा जलसंचय अशा विविध उपक्रमांचा आढावा घेण्यात आला. शून्य प्रलंबितता अंतर्गत जुनी प्रकरणे, नागरिकांच्या तक्रारी, लोकप्रतिनिधींची पत्रे आदींचा निपटारा करावा,असे निर्देश देण्यात आले.

## महावितरणची लकी डिजिटल ग्राहक योजना तिसरा व अंतिम लकी ड्रॉ १० जून रोजी

छत्रपती संभाजीनगर : महावितरणच्या लकी डिजिटल ग्राहक योजनेचा तिसरा व अंतिम लकी ड्रॉ ऑनलाईन पद्धतीने १० जून २०२५ रोजी काढण्यात येणार आहे. यातून प्रत्येक उपविभाग स्तरावर एक याप्रमाणे पहिल्या क्रमांकाकरिता ६५१ विजेत्या ग्राहकांना स्मार्टफोन बक्षीस म्हणून दिला जाणार आहे. तर प्रत्येक उपविभागात प्रत्येकी दोन याप्रमाणे दुसऱ्या क्रमांकासाठी १३०२ विजेत्या ग्राहकांना स्मार्टफोन व प्रत्येकी दोन याप्रमाणे तिसऱ्या क्रमांकासाठी १३०२ विजेत्या ग्राहकांना स्मार्टवॉच बक्षीस म्हणून दिली जाणार आहे. ७ एप्रिल व ७ मे रोजीच्या पहिल्या व दुसऱ्या लकी ड्रॉमधील विजेत्यांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले आहे. महावितरणने ऑनलाईन वीज बिल भरणाऱ्या ग्राहकांचा टक्का वाढविण्याच्या हेतूने लकी डिजिटल ग्राहक योजना सुरू केली आहे. १ जानेवारी ते ३१ मे २०२५ या कालावधीत सलग तीन वा तीनपेक्षा अधिक वीजबिले ऑनलाईन पद्धतीने भरणाऱ्या सर्व लघुदाब वीजग्राहकांना या योजनेचा फायदा होणार आहे. ही योजना महावितरणच्या अशा लघुदाब चालू (एलटी- लाईव्ह) वीजग्राहकांसाठी लागू असून, ज्यांनी १ एप्रिल २०२४ पूर्वी मागील एक वर्ष म्हणजे १.४.२०२३ ते ३१.३.२०२४ या कालावधीत एकदाही वीजबिलाचा ऑनलाईन पद्धतीने भरणा केलेला नाही. अधिक माहितीसाठी महावितरणच्या www.mahadiscom.in या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी. ग्राहक रांगेत उभे राहण्यापेक्षा वेळ, श्रम व पैशांची बचत करीत डिजिटल पद्धतीने वीजबिल भरणा करण्यास प्राधान्य देत आहेत. ग्राहकांना डिजिटल पद्धतीने वीजबिलाचा भरणा करता यावा, यासाठी महावितरणकडून संकेतस्थळ, महावितरण मोबाईल पची सुविधा ग्राहकांना उपलब्ध करून दिलेली आहे. ग्राहकांना देय रकमेवर ०.२५ टक्के डिजिटल वीजबिल भरणा सूट दिली जाते. परिणामी सध्या राज्यात ७० टक्क्यांहून अधिक वीजग्राहक ऑनलाईन पद्धतीने वीजबिलाचा भरणा करीत आहेत. हे प्रमाण वाढविण्यासाठी व ग्राहकांना प्रोत्साहन देण्यासाठी लकी डिजिटल ग्राहक योजना राबविण्यात येत आहे.

## जगप्रसिद्ध अजिंठा लेणी मधील मधमाशांचे पोळ पुणे येथील रेस्कू टिम येणार



तभा वृत्तसेवा

फर्दापूर दि ९ बकरी ईदच्या दिवशीच्या २०० पर्यटकांना मधमाशांनी चावा घेऊन जखमी केल्याच्या घटनेचे गांभीर्य लक्षात घेता रविवारी वनविभागाचे पथक अजिंठा लेणीत धडकले.

अजिंठा लेणी परिसरातील लेणी क्र.४,९,१० व २६ समोर अस्तित्वात असलेल्या आग्या मोहळांची पाहणी केली.भारतीय पुरातत्व विभाग व वनविभागात पोळे काढण्यासाठी आवश्यक ते साधन सामुग्री गोळा करण्याबाबत चर्चा झाली होती.त्या अनुषंगाने सोमवारी अजिंठा लेणी बंद असल्याने सकाळपासूनच वनविभाग, भारतीय पुरातत्व विभाग,रसायन विभाग व सुरक्षारक्षक यांचे साधारणतः ५० ते ६० कर्मचाऱ्यांनी सर्वाधिक ६ पोळे असणाऱ्या लेणी क्र.१० समोर लोखंडी गोलाकार पाईपाचे मचांग उभारणीचे काम युद्धपातळी वर सुरू केले आहे.लेणी क्र.१० ची जमिनीपासून उंची ही ६० फूट उंच असल्याने पाल उभारण्यासाठी कर्मचाऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. सोमवारी सकाळपासून लेणी क्र.१० समोर पोळ काढण्यासाठी लागणारे पाल उभारण्याचे काम सुरू आहे.लवकरच मधमाशांचे पोळ काढून सुरक्षित स्थळी स्थलांतरित करण्यात येईल. असे मनोज पवार,संवर्धन सहायक,भारतीय पुरातत्व विभाग अजिंठा लेणी यांनी सांगितले आहे.

## कॅंटाबिलने ॲक्सेसरीज स्टोअरचे उद्घाटन केले

सोलापूर – भारतातील आघाडीच्या वस्त्र उत्पादक आणि किरकोळ विक्रेत्यांपैकी एक असलेल्या कॅन्टाबिल रिटेल इंडिया लिमिटेडने सोलापूरमध्ये त्यांचे नवीन रिटेल स्टोअर उघडण्याची घोषणा केली आहे. २१३२ चौरस फूट क्षेत्रात पसरलेले हे ब्रँड स्टोअर दुकान क्रमांक १, ग्राउंड अँड फर्स्ट फ्लोअर, २१७/३, सिव्हिल लाइन्स, महावीर चौकाजवळ, सिप्स एन बाइट्स रेस्टॉरंटच्या खाली, सोलापूर (महाराष्ट्र) येथे आहे, जे ब्रँडच्या विस्तार प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. पुरुष आणि महिलांसाठी फॉर्मल-वेअर, कॅज्युअल आणि पार्टी-वेअर कपड्यांची विस्तृत निवड प्रदान करण्यासाठी समर्पित, कॅन्टाबिलने फुटवेअर तसेच ॲक्सेसरीजची विस्तृत श्रेणी ऑफर करण्यासाठी आपला रिटेल व्यवसाय वाढवला आहे. देशभरात ६०० स्टोअर्स उघडून, फॅशन उद्योगात आघाडीचे स्थान मजबूत करून कॅन्टाबाईलने एक उल्लेखनीय टप्पा गाठला आहे.

## वंचित महिलांसाठी मोफत कर्करोग तपासणी उपक्रम

शिर्डी, ९ जून २०२५ – ग्रामीण महाराष्ट्रातील वंचित महिलांसाठी प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा पुरविण्याच्या उद्देशाने, ११० वर्षांचा वारसा असलेल्या हिंदुजा ग्रुपची परोपकारी शाखा हिंदुजा फाउंडेशन, हिने अहमदनगरस्थित प्रतिष्ठित स्वयंसेवी संस्था डॉ. माने मेडिकल फाउंडेशन अँड रिसर्च सेंटर हिच्याशी सामंजस्य करार केला आहे. या भागीदारीतून शिर्डीमध्ये आणि राज्यातील इतर जिल्ह्यांमध्ये संपूर्णपणे मोफत कर्करोग तपासणी व जनजागृती उपक्रम सुरू करण्यात आला आहे. डिसेंबर २०२५पर्यंत १०,००० अत्यंत गरीब महिलांची गर्भाशय मुख (सर्व्हायकल) व स्तन कर्करोगासाठी तपासणी करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. या मोहिमेअंतर्गत पहिले तपासणी शिबीर ८ जून रोजी शिर्डीपासून ६० किमी अंतरावरील राहुरी येथे पार पडले. तेथे सुमारे ३५० महिलांची तपासणी करण्यात आली. कर्करोगाचे लवकर निदान व वेळेवर उपचार हे उद्दिष्ट या उपक्रमाच्या केंद्रस्थानी आहे. वंचित समुदायांना आर्थिक अडचणी व भौगोलिक मर्यादांमुळे अशा तपासण्या करून घेता येत नाहीत. त्यांच्यासाठी प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा उपलब्ध करून ही तफावत भरून काढण्याचा हा प्रयत्न आहे.

# अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे सरसकट पंचनामे करावेत : राधाकृष्ण विखे पाटील

### नैसर्गिक संकटात शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे



राहाता तालुक्यातील बाभळेश्वर, राजुरी ममदापूर, तिसगाव वाडी, अस्तगाव अतिवृष्टी पीक नुकसानीची पालकमंत्र्यांनी केली पाहणी

शिर्डी, दि.९ -* राहाता तालुक्यातील बाभळेश्वर, राजुरी ममदापूर, तिसगाव वाडी, अस्तगावच्या काही भागांमध्ये चक्रीवादळ सदृश्य पावसाने डाळिंब, आंबा, ऊस व साठवलेला कांदा तसेच घरे, गोठा यांवर झाडे पडून मोठे प्रमाणात नुकसान झाले असून या नुकसानीचे सरसकट पंचनामे करण्यात यावेत, शासन नैसर्गिक संकटात शेतकऱ्यांसह नागरिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याची ग्वाही राज्याचे जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी दिली.

राहाता तालुक्यातील या नुकसानग्रस्त भागाची पालकमंत्री श्री.विखे पाटील यांनी पाहणी करत शेतकऱ्यांशी संवाद साधत दिलासा दिला. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी उपविभागीय अधिकारी माणिक आहेर, तहसीलदार अमोल मोरे, तालुका कृषी अधिकारी आबासाहेब भोरे, यांच्यासह वीज वितरण कंपनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री.विखे पाटील म्हणाले, जिल्ह्यात मागील काही दिवसांत मोठ्या स्वरुपातील पावसाने झालेल्या नूकसानीचा विचार करता स्थायी आदेशाच्यापलीकडे जावून मदत करण्याचा विचार करावा लागणार आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांच्याशी प्राथमिक चर्चा झाली आहे. झालेल्या नूकसानीचे सरसकट पंचनामे करावेत, महावितरणाचा विज पुरवठा सुरळीत करण्यासाठी अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे, अशा सूचनाही त्यांनी यावेळी केल्या.

शनिवार, दि.७ जून रोजी सायंकाळी बाभळेश्वर, राजुरी, ममदापूर, तिसगाव, अस्तगाव या भागामध्ये चक्री वादळाने फळबागा तसेच शेती पीकांचे मोठ्या प्रमाणात नूकसान झाले आहे. भाऊसाहेब विनायक म्हस्के यांची कांदा चाळ, डाळिंब उत्पादक राहुल सुरेश कसाब आणि डाळींबरत्न बी. टी. गोरे यांच्या डाळींब बागा थेट शेतात जाऊन या नुकसानग्रस्त भागाची पाहणी पालकमंत्र्यांनी पाहणी केली.

वादळी वाऱ्यामुळे या भागातील वीज पुरवठा हा गेल्या दोन दिवसापासून बंद आहे. वीज पुरवठा तातडीने सुरू करण्यासाठी महावितरणच्या अधिकाऱ्यांनी युध्द पातळीवर प्रयत्न करण्याचे निर्देश मंत्री विखे पाटील यांनी दिले. नैसर्गिक आपती असली तरी,भविष्यात नुकसान कसे टाळता येऊ शकते यावरच उपाय योजना करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. प्रत्येकाचा पंचनामा करून तातडीने अहवाल सादर करा अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

पाहणी दरम्यान पालकमंत्र्यांनी डाळिंब उत्पादकांशीही संवाद साधला अनेक भागांमध्ये डाळिंब उत्पादकांनी नवनवीन तंत्रज्ञान वापरले आहे. नवीन तंत्रज्ञानाच्या वापरामुळे शेतकऱ्यांना उत्पादनही मोठ्या प्रमाणात मिळत आहे. राहुल कसाब यांची फळभाग पूर्णपणे भुईसपाट झाली आहे, या बागेची पुन्हा बांधणी करण्यासाठी काय उपाययोजना करता येईल याविषयी डाळिंबरत्न डॉ. बी.टी. गोरे यांच्याशी यासंदर्भात चर्चा करून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. आंबा, कांदा उत्पादकांना देखील या वादळी पावसाचा मोठा फटका बसला आहे. कांदा चाळीवर पडलेल्या झाडांमुळे भिजलेल्या कांद्याचे पंचनामे करून अहवाल त्वरित पाठवण्याची सूचनाही श्री.विखे पाटील केल्या आहेत.

## अरुणोदय गो शाळेचे कार्य आदर्शवत – गो सेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा

### स्व. माजी आमदार अरुणकाका जगताप यांच्या कुटुंबियांची सांत्वनपर भेट



अहिल्यानगर : महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांनी जिल्ह्याचे ज्येष्ठ नेते व विधान परिषदेचे माजी आमदार स्व. अरुणकाका जगताप यांच्या निधनानंतर त्यांच्या निवासस्थानी भेट देत आमदार संग्राम जगताप व कुटुंबीयांचे सांत्वन केले. यावेळी अभिजित खोसे, अमित गटणे, किरण भळगट, महेश लोंढे, सागर गुंजाळ आदी उपस्थित होते.

या प्रसंगी बोलताना मुंदडा यांनी स्व. अरुण काकांच्या सामाजिक व जनतेसाठी केलेल्या कार्याची आठवण करून दिली. त्यांनी स्थापन केलेल्या अरुणोदय गोशाळा या संस्थेमार्फत गावागावात गोसेवा ही केवळ धार्मिक परंपरा नसून सामाजिक बांधिलकी म्हणून कशी जोपासली जाऊ शकते, याचे उत्तम उदाहरण त्यांनी दिले,

गो सेवा ही ग्रामीण संस्कृतीची मुळं आहेत. स्व. अरुणकाकांनी ती आपल्या कृतीतून साकारली. त्यांच्या या कार्यामुळे अनेकांना प्रेरणा मिळत आहे, असे गौरवोद्गार त्यांनी यावेळी काढले. स्व. अरुण काकांनी गोसेवेच्या माध्यमातून समाजात एक वेगळे स्थान निर्माण केले होते. त्यांच्या निधनामुळे जिल्ह्याने एक सच्चा जननेता व गोसेवक गमावला आहे, अशी भावनाही यावेळी उपस्थितांमध्ये व्यक्त झाली. या भेटीप्रसंगी अरुणोदय गोशाळेतील कार्याचा आढावा घेण्यात आला व भविष्यात गो सेवेच्या क्षेत्रात या कार्याची व्याप्ती वाढविण्याचा निर्धारही करण्यात आला.

## गंगापूर आगारास बीएस-६ प्रणालीच्या पाच नवीन बसेस



तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.९:राज्य परिवहन महामंडळाच्या गंगापूर आगारास बीएस-६ प्रणालीच्या नवीन पाच बसेस मिळाल्या असून रविवारी पासून त्या सर्वसामान्य नागरिकांच्या सेवेसाठी सुरू करण्यात आल्या आहेत.

गंगापूर आगारास बीएस-६ प्रणालीच्या बसेस उपलब्ध करून द्याव्यात यासाठी आमदार सतीश चव्हाण शासनस्तरावर वेळोवेळी पाठपूरावा करत होते. राज्याचे परिवहन मंत्री मा.ना. प्रतापजी सरनाईक यांना १५ मार्च २०२५ रोजी आमदार सतीशभाऊ चव्हाण यांनी पत्राव्दारे गंगापूर आगारातील बसेसची झालेली बिकट अवस्था निर्दशनास आणून देत गंगापूर आगारास नवीन बसेस उपलब्ध करून देण्याची आग्रही मागणी केली होती.

अखेर आमदार सतीशभाऊ चव्हाण यांच्या प्रयत्नाला यश आले असून गंगापूर आगारास बीएस-६ प्रणालीच्या पाच नवीन बसेस उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. सर्वसामान्य नागरिकांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न आ. सतीश चव्हाण यांनी मार्गी लावला आहे. या लोकार्पण सोहळ्यास गाथा मूर्ती ह भ प रामभाऊ महाराज राऊत माजी नगराध्यक्ष संजय जाधव माजी नगरसेवक प्रदीप पाटील ज्ञानेश्वर साबणे गंगापूर आगार व्यवस्थापक विजय बोरसे यांची प्रमुख उपस्थिती होती.

### महानगरपालिकेच्या १८.५० टन व ७ टन क्षमतेच्या सक्शन अँड जेटिंग वाहनांचे लोकार्पण

## चेंबर, ड्रेनेज लाईनच्या साफसफाईसाठी राज्य शासनाकडून दोन नवीन अत्याधुनिक वाहने उपलब्ध

### नवीन वाहनांमुळे नागरिकांच्या तक्रारींवर तत्काळ उपाययोजना होतील : आ. संग्राम जगताप

अहिल्यानगर – दिवसेंदिवस शहराचा विस्तार होत आहे. लोकसंख्या वाढत आहे. त्याच प्रमाणात सेवा व सुविधांची मागणीही वाढत आहे. त्यासाठी महानगरपालिकेची सेवा व सुविधा पुरवणारी यंत्रणा बळकट असणे आवश्यक आहे. याच दृष्टिकोनातून राज्य शासनाकडे पाठपुरावा करून शहरातील ड्रेनेज लाईन, चेंबरची तत्काळ व अधिक प्रभावीपणे साफसफाई होण्यासाठी महानगरपालिकेला अत्याधुनिक वाहने उपलब्ध करून दिली आहे. या वाहनांमुळे नागरिकांच्या तक्रारीवर तत्काळ कृती होऊन त्यांच्या समस्याही तत्काळ सोडवता येतील, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

आमदार संग्राम जगताप यांच्या पाठपुराव्यामुळे राज्य शासनाने उपलब्ध करून दिलेल्या सक्शन अँड जेटिंग वाहनांचे लोकार्पण आमदार संग्राम जगताप व आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांच्या हस्ते सोमवारी महानगरपालिकेत पार पडले. दोन वाहने उपलब्ध झाली असून, ७ टन क्षमतेच्या वाहनाचे लोकार्पण सफाई कामगारांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपायुक्त संतोष टेंगळे, विजयकुमार मुंडे व महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. आमदार संग्राम जगताप म्हणाले की, महानगरपालिका आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांच्या समस्या सोडवते. मात्र, अनेकवेळा साधन सामग्री अथवा अद्ययावत मशिनरी नसल्यामुळे समस्या सोडवताना अडथळे येतात किंवा उपाययोजनांसाठी वेळ लागतो. त्यामुळे महानगरपालिकेची यंत्रणा अत्याधुनिक साहित्य, साधन सामग्रीसह सज्ज असणे आवश्यक आहे. त्यामुळे हे नवीन वाहन उपलब्ध करून देण्यात आले आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस असून, या काळात निर्माण होणाऱ्या अडचणी, समस्या सोडवण्यासाठी याचा प्रभावीपणे वापर होईल, असा विश्वासही आमदार संग्राम जगताप यांनी व्यक्त केला.

आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे म्हणाले की, ड्रेनेज लाईन, चेंबर साफसफाईसाठी ही गाडी राज्य शासनाकडून आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून उपलब्ध झाली आहे. १८.५० टन क्षमतेच्या या वाहनात तीन प्रकाराच्या सुविधा उपलब्ध आहेत. ड्रेनेज, चेंबरमधील मैला उपसा करून त्यावर या गाडीतच प्रक्रिया करण्याची सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे प्रक्रिया होऊन उपलब्ध होणारे पाणी जेटिंगसाठी वापरता येते. त्यासाठी वाहनात नव्याने पाणी भरण्याची आवश्यकता नाही. या वाहनात ८ हजार लिटर क्षमतेची टाकी आहे. दुसरे वाहन ७ टन क्षमतेचे असून त्यात ३ हजार लिटर क्षमतेची टाकी आहे. वाहन चालक व कर्मचाऱ्यांना उत्तमरीत्या प्रशिक्षण देऊन तयार केलेले आहे. या वाहनामुळे कुठलाही भार महानगरपालिकेवर पडणार नाही. थ्री इन वन वाहन असल्याने व प्रतिदिन सलग आठ तास काम करण्याची या गाडीची क्षमता असल्याने नागरिकांच्या समस्या वेळेत व अधिक चांगल्या पद्धतीने सोडवता येतील.

## अशोक धुतकर शिक्षक संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी निवड

कन्नड: दि.०९ जून – तालुक्यातील ब्राह्मणी गराडा येथील कै.गुरुदयालसिंग राठोड माध्यमिक व जय बालाजी उच्च माध्यमिक आश्रम शाळा येथे कार्यरत असलेले प्राध्यापक व कवी अशोक धुराजी धुतकर यांची महाराष्ट्र राज्य धोबी (परीट) समाज महासंघ यांच्यावतीने छत्रपती संभाजी नगर (परीट) धोबी समाजाचे शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली त्यांचे नियुक्ती बद्दल शिक्षक सोसायटी व्यवस्थापक कल्याण चव्हाण, अंबाडी मध्यम प्रकल्प जलसंपदा विभागाचे गणेश वाघ यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

## प्रतिबंधात्मक आदेश

छत्रपती संभाजीनगर, दि.९(जिमाका) – आगामी कालावधीत कायदा सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून जिल्ह्यातील ग्रामीण भागात महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व ३७(३) अन्वये मनाई आदेश जारी करण्यात आले आहेत. अपर जिल्हादंडाधिकारी संगिता राठोड यांनी हे आदेश निर्गमित केले असून दि.२४ जून पर्यंत हे आदेश अंमलात राहतील,असेही स्पष्ट करण्यात आले आहे.


## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापूर जि. औरंगाबाद**

सिव्हील एम.ए.क. ३११/२०२५ पु.ता. १८/०६/२०२५

अर्जदार : १) मंदाबाई विठठल चापे, वय. ६४ वर्षे, धंदा, शेती, रा. कदिम शहापूर ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर २) नामदेव विठठल चापे, वय. ४७ वर्षे, धंदा, शेती, रा. कदिम शहापूर ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर ३) सौ मुक्ताबाई कडुबाळ मुळे, वय. ५० वर्षे, धंदा, शेती, रा. टेंभापूरी ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर ४) सौ. शारदा संजय भांगे, वय. ४३ वर्षे, धंदा, शेती, रा. खडके ता. नेवासा जि. अहिल्यानगर ५) ज्योती पि. विठठल चापे, वय. ३९ वर्षे, धंदा. शेती, रा. कदिम शहापूर ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार – निरंक

प्रकरण – वारस प्रमाणपत्र (हेअरशिप प्रमाणपत्र) मिळणे बाबत.

याअर्थी, वरील अर्जदारांनी ॲड. एस. के. लांडे यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क. २ ते ५ हे आपसात नात्याने सख्खे भाउ व बहिणी असून अर्जदार क. १ ही अर्जदार क. २ ते ५ यांची आई आहे. अर्जदार क. १ चे पती व अर्जदार क. २ ते ५ यांचे वडील नामे विठठल भाउराव चापे हे मौजे कदीम शहापूर ता. गंगापूर येथील रहीवासी होते व ते दिनांक २७/०१/२०२५० रोजी मौजे कदीम शहापूर ता. गंगापरू जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे. मयत विठठल भाउराव चापे यांना अर्जदार क. १ ही पत्नी, अर्जदार क. २ हा मुलगा व अर्जदार क. ३ ते ५ हया मुली असे कायदेशीर वारसदार असून अर्जदारांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयत विठठल भाउराव चापे यांच्या मृत्यु पश्चात अर्जदार क. १ ते ५ यांना शासकीय व निमाशसकीय व इतर कार्यालयीन कामाकरीता मयत विठठल भाउराव चापे यांचे वारस असल्याचे वारस प्रमाणपत्राची (हेअरशिप सर्टिफिकिट) ची आवश्यकता आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यास कोणाचाही कोणत्याही प्रकराचा आक्षेप, उजर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः किंवा वकिला मार्फत आक्षेप उजर नोंदवावा. मुदतीत आक्षेप उजर न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. करिता हे जाहीर प्रगटन.

दिनांक :– १६/०५/२०२५

आदेशावरूत
सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी व फौजदारी न्यायालय, गंगापूर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापूर जि. औरंगाबाद**

सिव्हील एम.ए.क. ३२१/२०२५ पु.ता. १०/०६/२०२५

अर्जदार : १) मिना अशोक कोरडे, वय. ५४ वर्षे, धंदा, शेती, रा. वाहेगांव ता. गंगापूर जि. औरंगाबाद २) कृष्णा अशोक कोरडे, वय. २९ वर्षे, धंदा, शेती, रा. वाहेगांव ता. गंगापूर जि. औरंगाबाद ३) गोकुळ अशोक कोरडे, वय. २६ वर्षे, धंदा, शेती, रा. वाहेगांव ता. गंगापूर जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार – निरंक

प्रकरण – वारस प्रमाणपत्र (हेअरशिप प्रमाणपत्र) मिळणे बाबत.

याअर्थी, वरील अर्जदारांनी ॲड. एस. के. लांडे यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क. १ चे पती व अर्जदार क. २ व ३ चे वडील नामे अशोक रामचंद्र कोरडे हे मौजे वाहेगांव ता. गंगापुर येथील रहीवासी होते व ते दि. ०७/०७/२०२१ रोजी मौजे वाहेगांव ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले आहेत तसेच, अर्जदार क. १ ते ३ हे वर नमुद पत्त्यावरील रहीवासी असून मयत नामे अशोक रामचंद्र कोरडे यांना अर्जदार क. १ ते ३ हे एकमेव कायदेशीर वारसदार असून यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयतांच्या माघारी केवळ अर्जदार क. १ ते ३ हेच एकमेव कायदेशीर वारसदार आहे व इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदारांना शासकीय/निमशासकीय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यास कोणाचाही कोणत्याही प्रकराचा आक्षेप, उजर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः किंवा वकिला मार्फत आक्षेप उजर नोंदवावा. मुदतीत आक्षेप /उजर न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. करिता हे जाहीर प्रगटन.

दिनांक :– १६/०५/२०२५

आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी न्यायालय, गंगापूर

## वसमतनगर नगरपरिषद, वसमतनगर

**जिल्हा हिंगोली**

Phone No.०२४५४ २२०१७५ www.basmatmc.org - E-mail: cobasmat@gmail.com

जा.क्र.कावि/पाणीपुरवठा/ २२६५/२०२५ दिनांक : ९/६/२०२५

### पाणीपुरवठा विभाग निविदा सुचना

नगरपरिषद निधी साल सन २०२४–२०२५ अंतर्गत कामाकरीता ऑफलाईन पध्दतीने निविदा (RFP) Request of proposal मागविण्यात येत असून कोऱ्या निविदा दि. १०/६/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून दि. १७/६/२०२५ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत नगरपरिषद कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध असतील. प्राप्त निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार राखून ठेवण्यात येत आहे. याबाबत विस्तृत माहिती पाणीपुरवठा विभाग, नगरपरिषद कार्यालय, वसमत यांचेकडे उपलब्ध होईल. शक्यतो निविदा दि. १८/६/२०२५ रोजी उघडण्यात येतील. तसेच निविदा धारकास खालील अटी व शर्तीची पूर्तता करणे बंधनकारक असेल.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रक रक्कम (GST व इतर वगळून) | अनामत रक्कम २% | बिलातील कपात ३% | कोरी निविदा रक्कम | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वसमत नगर परिषद पाणीपुरवठा अंतर्गत प्रभाग क्र. ७ मधील कोहीनूर कॉलनी येथे कउझए पाईपलाईन करणे | ४०२०८२ | ८००० | १२१०० | ५०० | १०० दिवस |

निविदा बाबत माहिती

अटी व शर्ती :–

१) सदरील निविदा सुचना कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.
२) सदर निविदा कोणतेही कारण न दर्शविता रद्द करण्याचे अधिकार नगर परिषदेने राखुन ठेवले आहे.
३) निविदेची किंमत व सुरक्षा अनामत राष्ट्रीयकृत बँकेचे एफडीआर / रोख मुख्याधिकारी नगरपरिषद वसमत यांच्या नावाने भरणा करावी लागेल.
४) निविदे सोबत आवश्यक त्या अभिलेखाच्या सत्यप्रती कार्यालयात दोन लिफाफा पध्दतीने बंद पाकिटात सादर करावे लागतील.
५) शासन नियमानुसार ईपीएफची रक्कम भरण्याची जबाबदारी संबंधीत गुत्तेदाराची राहील.
६) कामाची गुणवत्ता व दर्जा बाबत सक्षम अधिकाऱ्यांमार्फत तांत्रिक तपासणी करुन घ्यावी.
७) मंजुर अंदाजपत्रकीय भौतिक मानकानुसार काम करावे.
८) सदर कामाचा अनुभव असणारांना प्राधान्य देण्यात येईल.

**(नितीन चव्हाण)** कनिष्ठ अभियंता नगरपरिषद वसमत

**(रमेश वाघमारे)** नगर अभियंता नगरपरिषद वसमत

मुख्याधिकारी तथा प्रशासक नगरपरिषद वसमत

## अग्रलेख...

# कोल्ह्याला द्राक्षे आंबट

विकासाची गाडी वेगात दौडत असल्याने सध्या देशातील वातावरण सकारात्मक ऊर्जेने ओतप्रोत आणि चैतन्याने भारलेले आहे. अनेक चांगल्या गोष्टी घडत असताना विरोधी पक्षांना मात्र हे सहन होत नसल्याचे उघडपणे दिसत आहे. हिमालयीन रांगांमधील सर्वांत कठीण, दुर्गम असलेल्या पिरपंजाल पर्वताची छाती फोडून आपल्या अभियंत्यांनी श्रीनगरच्या पलीकडे असलेल्या बारामुल्ला शहरापर्यंत रेल्वेमार्ग नेला. याच मार्गावरून ६ जून रोजी कटरा येथून निघालेली केसरी वंदे भारत ट्रेन चिनाबवरील पूल पार करीत बारामुल्लाला पोहोचली. हा दिवस सर्व भारतीयांसाठी अभिमान आणि गौरवाचा ठरला. जम्मू-काश्मीरच्या विकासासाठी जेवढे प्रयत्न गेल्या दहा वर्षांत झाले तेवढे गेल्या ६० वर्षांतही झाले नाहीत. श्रीनगर-उधमपूर-जम्मू रेल्वे मार्गाचे भूमिपूजन खरे तर १९८३ मध्ये तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या हस्ते झाले होते, पण काम पूर्ण झाले भारतीय जनता पक्षाच्या राजवटीत. हा प्रकल्प पूर्ण झाल्याबद्दल बहुतांश राजकीय पक्षांनी मोदी सरकारचे लाजेस्तव का होईना अभिनंदन केले असले तरी काँग्रेसच्या एकाही बड्या नेत्याने चकार शब्दही काढला नाही. वास्तविक पाहता या प्रकल्पाची पायाभरणी राहुल गांधी यांच्या आजीने केली होती. १९८३ मध्ये या प्रकल्पाची किंमत फक्त ५० कोटी होती. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर आणि पहिली वंदे भारत ट्रेन श्रीनगरला पोहोचल्यानंतर एरवी छोट्या छोट्या गोष्टींसाठी प्रसारमाध्यमांवर मते व्यक्त करणारे राहुल गांधी यांनी मोदी सरकारचे अभिनंदन करणे तर सोडाच स्तुतीचा एक शब्दही काढला नाही. वास्तविक पाहता काश्मीर खोऱ्यात भाजपाचा एकही आमदार नाही. निवडणुकीच्या काळात पक्षाचा प्रचार करण्यासाठीही कुणी तयार होत नसतो. निवडणूक लढविण्यासाठी उमेदवारही पुढे येत नाहीत. पण, सत्तेचा विचार न करता मोदी सरकारने निवडणुकीतील निकाल विरोध जातात की बाजूने, याचा विचार न करता गेल्या दहा वर्षांपासून काश्मीर खोऱ्यात झपाट्याने विकास चालविला आहे. जेव्हा विकास होत असतो तेव्हा जनमतही हळूहळू का होईना विकास करणाऱ्यांच्या बाजूने तयार होत असते. नकारात्मक राजकारण करून काहीही साध्य होणार नाही, हे राहुल गांधी यांना केव्हा कळेल हे देवच जाणे. काहीना काही विचित्र, निराधार आणि अवास्तव विधान करून गोंधळ घालणे हे राहुलबाबाचे खास वैशिष्ट्य झाले आहे. निवडणूक आली की हे महाशय सक्रिय होतात आणि सत्ताधाऱ्यांवर टीका करण्याच्या नादात नको ते बोलतात. याचे ताजे प्रकरण म्हणजे त्यांनी एका इंग्रजी दैनिकातील लेखात निवडणूक आयोगावर केलेले वक्तव्य होय. बिहारमध्ये या वर्षाच्या शेवटी विधानसभा निवडणूक होण्याची शक्यता आहे. या निवडणुकीत काय होणार आहे, याची जाणीव राहुल गांधी यांना झाली असल्यानेच त्यांनी निवडणूक आयोगावर टीका करणे सुरू केले आहे. २०२४ मध्ये महाराष्ट्रात झालेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा मोठा पराभव झाला. स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्रात प्रथमच काँग्रेसला एवढ्या कमी म्हणजे १६ जागा मिळाल्या. उद्धव ठाकरेंच्या पक्षाला तरी २० जागा मिळाल्या. एवढा दारुण पराभव होऊनही काँग्रेसचे डोळे उघडले नाहीत. जो महाराष्ट्र सातत्याने काँग्रेसच्या पाठीमागे उभा होता त्या राज्यात एवढी वाईट अवस्था पक्षाची का व्हावी याचा विचार करणे आवश्यक आहे.

तशी देशात काँग्रेसची घसरण १९९० पासूनच सुरू झाली. फरक एवढाच की राहुलबाबाच्या काळात नीचांकी कामगिरीचे सर्व विक्रम मोडीत निघाले. ज्या निवडणूक व्यवस्थेवर काँग्रेस सातत्याने प्रहार करते, ती व्यवस्था काँग्रेसच्याच काळात निर्माण केली गेली. त्यामुळे ईव्हीएमविरोधात रान उठविणे म्हणजे कोल्ह्याला द्राक्षे आंबट असा प्रकार होय. बिहार विधानसभेतही काँग्रेसच्या पदरात फार जागा आहेत, असे नाही. महाराष्ट्र आणि बिहार मिळून विधानसभेच्या एकूण ५३१ जागा आहेत. महाराष्ट्रात २८८, तर बिहार विधानसभेच्या २४३ जागा आहेत. दोन्ही राज्ये मिळून काँग्रेसकडे आहेत फक्त ३५ जागा. यावेळची काँग्रेसची स्थिती तर फारच वाईट आहे. नितीशकुमार यांच्या नेतृत्वातील जदयू आणि भाजपा यांची युती असल्याने आणि सध्या देशातील भाजपासाठीचे सकारात्मक वातावरण पाहता २०२० मध्ये काँग्रेसला मिळालेल्या १९ जागाही कायम राहतील की नाही, याची शाश्वती नाही. लोकसभेतही तेच हाल आहेत. बिहारमधील लोकसभेच्या ४० पैकी फक्त ३ जागा काँग्रेसकडे आहेत. यापैकी एक जागा किशनगंज लोकसभा मतदारसंघाची आहे. ज्यामध्ये ७० टक्क्यांच्या आसपास मुस्लिम मतदार आहेत.

देशातील हिंदी पट्ट्यामधील बिहार हे महत्त्वाचे राज्य आहे. मार्च १९९० पासून बिहारमध्ये काँग्रेसचा मुख्यमंत्री नाही. कधीकाळी देशावर एकछत्री राज असलेल्या देशातील या सर्वांत जुन्या राजकीय पक्षावर एवढी वाईट स्थिती का यावी, याचा विचार न करता निवडणूक आयोग किंवा केंद्र सरकारवर टीका करून काहीही साध्य होणार नाही. ईव्हीएम मशीन हॅक होत आहे हे सिद्ध करून दाखवा, असे आवाहन निवडणूक आयोगाने गेल्या लोकसभा निवडणुकीच्यावेळीही केले होते. त्यावेळी काँग्रेसचा एकही प्रतिनिधी निवडणूक आयोगाकडे गेला नाही. काँग्रेसचे आताचे रडगाणे हे मतदान प्रक्रियेवरचे आहे. मॅचफिक्सिंग करून निवडणूक आयोग आणि भाजपाने विधानसभा निवडणुकीचे निकाल आपल्या बाजूने फिरविल्याचा गंभीर आरोप राहुल गांधी यांनी केला आहे. शेवटच्या एक दीड तासांत ७६ लाखांच्या आसपास मते वाढविल्याचा आरोप त्यांनी केला आहे. यालाही निवडणूक आयोगाने उत्तर दिले असताना राहुल गांधी बालिशपणे वक्तव्य करीत आहेत. एका इंग्रजी दैनिकात, ७ जूनच्या अंकात राहुल गांधी यांनी लेख लिहून विधानसभा निवडणुकीत गडबड केल्याचा आरोप केला आहे. निवडणूक आयोगानेही आकडेवारी जाहीर करीत प्रत्युत्तर दिले असले तरी राहुल गांधी सत्य मानायला तयारच नाहीत. मतदारयाद्यांमध्ये बोगस मतदारांची नावे घुसविल्याचा आरोप त्यांनी केला आहे. मात्र, अंतिम मतदारयाद्या सर्वच राजकीय पक्षांना उपलब्ध करून दिल्या. या मतदारयाद्यांना काँग्रेसने आक्षेप घेतला नाही. प्रत्येक मतदान केंद्रावर त्या त्या पक्षाचे प्रतिनिधी असतात. विधानसभा निवडणुकीच्या काळात १ लाख ३ हजार ७२७ प्रतिनिधी केंद्रांवर नियुक्त करण्यात आले होते आणि त्यामध्ये काँग्रेसच्या २७ हजार ९९ प्रतिनिधींचा समावेश होता. निव्वळ बोगस मतदान झाल्याचा आरोप करून चालणार नाही तर त्याचे पुरावेही सादर करावे लागतात. मतदान प्रक्रियेच्या काळात यापैकी काँग्रेसच्या एकाही केंद्र प्रतिनिधीने मतदारयाद्यांबाबत जिल्हाधिकाऱ्यापुढे खरे अपील दाखल केले नव्हते. आता थयथयाट करून काहीच उपयोग नाही.

महाराष्ट्रातील मतदारांनी दिलेला कौल मान्य करून बिहारात गेल्या निवडणुकीत जिंकलेल्या १९ जागा कायम राहतील, याकडे लक्ष द्यावे. जनता आता राजकीयदृष्ट्या जागृत झाली आहे. सत्तेची चावी कुणाच्या हातात द्यावी हे मतदारांना चांगले ठावूक झाले आहे. मतदारांना गृहीत धरण्याचे दिवस कधीचेच संपले आहेत. तेव्हा महाराष्ट्रातील निकालावर शंका व्यक्त करणे म्हणजे प्रत्यक्ष मतदारांनी दिलेल्या कौलाचा अवमान होय. कोण सत्य आणि वास्तवाला धरून बोलत आहे, हे जनता जाणून आहे. देशात २०१४ पासून जेवढ्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुका झाल्या आहेत त्यापैकी राहुल गांधी यांच्या नेतृत्वात किती जिंकल्या याचा प्रथम विचार करावा. निवडणुकीतील विजय काही वर्तमानातील कामगिरीवरही मिळत नसतो. भूतकाळात तुम्ही काय दिवे लावले आहेत याचा विचारही मतदार करतात. आज विकासाचा वारू चौखूर उधळत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वात भारत सुरक्षित असल्याची खात्री देशवासीयांना झाली आहे. मतदारांनी दिलेल्या कौलाचा मान राखण्याची सवय काँग्रेसला आणि राहुलबाबाला जेवढ्या लवकर होईल तेवढे चांगले.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# भारताचा मुकाबला चीनशी!

भारत-पाकिस्तान यांच्यात नुकत्याच झालेल्या संघर्षात भारताचा मुकाबला पाकिस्तानशी नाही तर चीनशी होता आणि यापुढेही तेच राहणार आहे, असा परखड निष्कर्ष, अमेरिकेच्या गुप्तचर विभागाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने भारत- पाकिस्तान यांच्यात नुकत्याच झडलेल्या संघर्षावर तयार केलेल्या अहवालात काढला आहे. अमेरिकन सिनेटसाठी तयार करण्यात आलेल्या या अहवालात भारत- पाकिस्तान संघर्षाची सविस्तर चर्चा करण्यात आली आहे.

**चीन आणि चीनच :** भारत-पाकिस्तान यांच्यात चार दिवस संघर्ष झडला. यात कोणत्या देशाची किती हानी झाली याचे दावे दोन्ही देशांकडून केले जात आहेत. तो एक वेगळा भाग आहे. हा संघर्ष भारत-पाकिस्तान यांच्यात झडला असला तरी, पाकिस्तान हा एक मुखवटा होता असे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. म्हणजे आजवर जी केवळ चर्चा केली जात होती, त्यावर या अहवालाने शिक्कामोर्तब केले आहे.

**जेएफ-१० थंडर :** पाकिस्तानने या संघर्षात वापरलेली जेएफ-१० थंडर जातीची विमाने चिनी बनावटीची होती असे सांगताना अहवालात म्हटले आहे की, चीन व पाकिस्तान यांच्या संयुक्त उपक्रमात या विमानाचे उत्पादन पाकिस्तानात केले जात आहे. चीनने आपली अद्ययावत लढाऊ विमाने पाकिस्तानला देण्याचा निर्णय यापूर्वीच घेतला आहे.

**पीएल-१५ :** पाकिस्तानने या संघर्षात पीएल-१५ या चिनी बनवाटीच्या प्रक्षेपणास्त्रांचा वापर केला. यात बीव्हीआर प्रणाली वापरण्यात आली आहे. आकाशात गेल्यावर वैमानिकास ५-१० किलोमीटरपर्यंत दिसू शकते. चीनने आपल्या विमानात बीव्हीआर म्हणजे बियॉण्ड व्हिज्युअल रेंज प्रणाली बसविली आहे. म्हणजे जे डोळ्यांना दिसू शकत नाही ते या विमानांना दिसते. या प्रणालीत दोन प्रकार आहेत. निर्यात केल्या जाणाऱ्या विमानांना १५० किलोमीटरपर्यंत दिसू शकते, तर चीनने स्वत:साठी विकसित केलेल्या विमानांमध्ये जवळपास ३०० किलोमीटर अंतरावरील विमान वैमानिकास पाहता येते. चीनने या संघर्षापूर्वी काही दिवस अगोदर आपल्याजवळील ही ३०० किलोमीटर अंतरापर्यंत पाहू शकणारी विमाने पाकिस्तानला दिली होती असे अहवालात नमूद केले आहे.

**नवे छायायुद्ध :** पाकिस्तान आजवर वेगवेगळ्या दहशतवादी संघटनांना हाताशी धरून भारताविरुद्ध छायायुद्ध चालवीत होता, आता तेच चीनने सुरू केले आहे. पाकिस्तानला सर्व प्रकारची मदत करून त्याने भारताविरोधात आघाडी उघडली असल्याचे अहवालात सांगण्यात आले आहे.

**आणखी एक अहवाल :** पाकिस्तानातील एका थिंक टँकने या संघर्षावर २४ पृष्ठांचा एक अहवाल प्रकाशित केला आहे. 'सिक्स्टिन अवर्स दॅट रिशेपड साऊथ एशिया' हे या अहवालाचे शीर्षक आहे. त्याच्या मुखपृष्ठावरच जेएफ-१० ही विमाने व पीएल-१५ हे प्रक्षेपणास्त्र दाखविण्यात आले आहे. याशिवाय जनरल मुनीर, पाक वायुदलप्रमुख सिद्धू, चिनी राष्ट्रपती शी जिन पिंग व अमेरिकेचे राष्ट्रपती ट्रम्प यांची छायाचित्रे त्यावर आहेत. हे मुखपृष्ठ पाहिल्यानंतर या अहवालात काय लिहिले असावे याची सहज कल्पना करता येते.

**संघर्ष फक्त १६ तासांचा :** भारत- पाकिस्तान संघर्ष चार दिवस चालला असला तरी या अहवालात तो फक्त १६ तास चालल्याचे सांगण्यात आले आहे. ६-७ मे च्या रात्री भारताने पाकिस्तानी दहशतवाद्यांच्या अड्ड्यांवर हल्ला चढविल्यानंतर दोन्ही देशांच्या वायुदलात ५९ मिनिटे संघर्ष झडला असे सांगत नंतर १० मे रोजी पुन्हा १५ तासांचा प्रक्षेपणास्त्रांचा संघर्ष झडला असे अहवालात नमूद करण्यात आले आहे. पाकिस्तानी लष्करी सूत्रांचा हवाला देत हा दावा करण्यात आला आहे.

**एकूण ११४ विमाने :** ५९ मिनिटांच्या या संघर्षात भारताने ७२ लढाऊ विमानांचा तर पाकिस्तानने ४२ लढाऊ विमानांचा वापर केला असे सांगितले जाते. भारताने मिराज -२०००, एसयू- २७, राफेल व मिग विमानांचा वापर केला तर पाकिस्तानने चिनी व अमेरिकन बनावटींच्या विमानांचा वापर केला.

**आकाश आणि अवकाश :** भारत- पाक संघर्षाने हवाई युद्धाचा नवा इतिहास लिहिला आहे असे सांगताना अहवालात म्हटले आहे की, हा संघर्ष केवळ आकाशात झडलेला नाही तर अवकाशात झडलेला आहे. चिनी उपग्रहांच्या मदतीने भारतीय वायुदळाची दळणवळण यंत्रणा ठप्प करण्यात पाकिस्तानी वायुदळास कसे यश मिळाले हे अहवालात नमूद करण्यात आले आहे. अर्थात या माहितीवर विश्वास ठेवण्याचे कारण नाही. भारतानेही पाकिस्तानी वायुदळाची दळणवळण यंत्रणा ठप्प केली होती. भारत-पाकिस्तान यांच्यात झडलेल्या या संघर्षात चीनने फार मोठी भूमिका बजावली हे आता अनेक देशांच्या लक्षात आले आहे.

**पैसा नाही, प्रक्षेपणास्त्रे :** चीनने पाकिस्तानला यापुढे जादा पैसा न देता, अत्याधुनिक प्रक्षेपणास्त्रे देण्याचा निर्णय घेतला असल्याचे सांगण्यात येते. अशा बातम्या चीनची राजधानी बीजिंगहून प्रसिद्ध होत आहेत. भारत-पाक संघर्षात चीनने बजावलेली ही सक्रियता आश्चर्यकारक अशीच आहे. कारण, आजवरच्या भारत-पाक संघर्षात चीनने ही सक्रियता दाखविली नव्हती.

**ग्रिफीथ एशिया :** ग्रिफीथ एशिया इन्स्टिट्यूटच्या अहवालात यावर एकप्रकारे शिक्कामोर्तब केले आहे. या संस्थेने पाकिस्तान-चीन संबंधावर एक अहवाल जारी केला आहे. त्यात चीनची पाकिस्तानातील आर्थिक गुंतवणुक ४० टक्क्यांनी घटली असल्याचे सांगण्यात आले आहे. मात्र, चीन-पाकिस्तान यांच्यातील शस्त्रव्यापार वाढला हे सांगण्यात आले आहे. चीनचा सरंक्षण खर्च ३१४ बिलियन डॉलर्स एवढा असून तो एकूण जगाच्या १२ टक्के असल्याचे सांगण्यात आले आहे. मागील ३० वर्षांपासून चीनच्या सरंक्षण खर्चात सतत वाढ होत असल्याचेही यात नमूद करण्यात आले आहे. चीनच्या एकूण शस्त्रनिर्यातीपैकी ६३ टक्के निर्यात एकट्या पाकिस्तानात होते याकडे अहवालात लक्ष वेधण्यात आले आहे. पाकिस्तानात शाहबाज शरीफ सरकार आल्यापासून चीन- पाकिस्तान सहकार्य कमालीचे वाढले असून, वर्षभरात दोन्ही देशांत १० उच्चस्तरीय चर्चा झाल्याचे अहवालात सांगण्यात आले आहे.

**चीनचा पुढाकार :** चीन, पाकिस्तानसोबतची आपली मैत्री 'आर्यन क्लॅड' म्हणजे घट्ट असल्याचे दोन्ही देश वारंवार सांगत आहेत. एवढेच नव्हे तर पाकिस्तान व तालिबान यांच्यातील मतभेद दूर करून त्यांना जवळ आणण्यात चीनने भूमिका बजावली आहे. व्याप्त काश्मीरचा विचार करता, भारत-अफगाणिस्तान सीमा ९७ किलोमीटरची आहे. भारताने तालिबान सरकारशी मैत्री करण्यापूर्वी चीनने पाकिस्तान-तालिबान यांच्यात मैत्री घडवून आणली.

**रशिया कुणाकडे? :** रशिया हा भारताचा खंदा समर्थक! आता त्याने पाकिस्तानला मोठी आर्थिक मदत करण्याचा निर्णय घेतला आहे. रशियाने अशा प्रकारच्या बातम्यांचा इन्कार केला असला तरी रशिया-चीन मैत्री जगजाहीर आहे. चीन पाकिस्तानला मदत करत असताना, रशिया भारताच्या मदतीला धावून येईल काय असा प्रश्न विचारला जाऊ लागला आहे.

**जायबंदी रशिया :** रशिया सध्या स्वत:च युक्रेन युद्धात अडकून पडला आहे. युक्रेनने त्याला दिलेला ताजा तडाखा तो अनेक वर्ष विसरू शकणार नाही असा आहे. यात रशियाचे हजारो कोटी रुपयांचे नुकसान झाले असल्याचे म्हटले जाते. त्याचीच काही प्रमाणात भरपाई करण्यासाठी रशियाने भारताला एसयू-५७ हे अत्याधुनिक लढाऊ विमान विकण्याचा प्रस्ताव दिला आहे. या विमानाची गुणवत्ता निर्विवाद आहे. हे जगातील एक सर्वोत्कृष्ट लढाऊ विमान मानले जाते. भारताने ते विकत घेतल्यास अमेरिका अधिक नाराज होणार हे स्पष्ट आहे.

## वेध

**पुंडलिक आंबटकर**

# महाराष्ट्र गाठणार ५ ट्रिलियनचा टप्पा?

महाराष्ट्राला २०४७ पर्यंत ५ ट्रिलियन डॉलर्स क्षमतेची अर्थव्यवस्था करण्याचा मनोदय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बोलून दाखविला आहे. ही बाब कठीण वाटत असली तरी अशक्य मात्र नक्कीच नाही. १ ट्रिलियन म्हणजे १ हजार अब्ज. परंतु, गोष्ट डॉलर्सची असल्याने हा आकडा या संख्येच्या कितीतरी अधिक पट होतो. सध्या संपूर्ण देशाची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलर्सच्या आत असताना मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्राला ५ ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था करण्याचा संकल्प कुठल्या आधारावर केला असेल, असा प्रश्न पडतो. परंतु, त्यांच्या संकल्पाला ठोस आधार आहे आणि महाराष्ट्र ५ ट्रिलियन डॉलर्स क्षमतेची अर्थव्यवस्था होत नाही, तोपर्यंत भारत क्रमांक १ ची आर्थिक महासत्ता म्हणून उदयास येऊ शकत नाही.

सध्या देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नवाढीचा वेग ६.५ टक्के असला तरी महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेने गगनभरारी घेतली आहे. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ७.३ टक्के इतक्या वेगाने वाढत आहे. अमेरिका ३० ट्रिलियन, चीन १९ ट्रिलियन आणि त्यानंतर जर्मनी व भारताचा क्रमांक लागतो. भारताने अलिकडेच जपानला मागे टाकून चौथ्या क्रमांकाची आर्थिक महासत्ता म्हणून मान मिळविला आहे. महाराष्ट्र लोकसंख्येत दुसऱ्या आणि क्षेत्रफळात तिसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. महाराष्ट्रात विविध आर्थिक स्रोत असले तरी आजही आपले राज्य कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. महाराष्ट्रातील कृषी क्षेत्राचे एकूण सकल राष्ट्रीय उत्पन्नात ११ टक्के योगदान असून ५० टक्क्यांपेक्षाही अधिक जनता या क्षेत्रावर अवलंबून आहे. त्यामुळे कृषिक्षेत्राच्या विकासाशिवाय सरकारचे स्वप्न पूर्ण होऊ शकत नाही. त्यामुळेच की काय, विविध योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना विपन्नावस्थेतून बाहेर काढण्याचा प्रयत्न सुरू आहे. परंतु, सरकारी योजना राबविणाऱ्या प्रशासकीय व्यवस्थेत आजही भ्रष्टाचाराचे प्रमाण आहे आणि देशाच्या विकासातील हा एक मुख्य अडसर आहे. केंद्र सरकारने नुकतेच हमीभाव जाहीर केले. परंतु, बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांचा माल हमीभावाने खरेदी होतो का, हा सर्वांत मोठा प्रश्न आहे. ही व्यवस्था बदलावी लागेल. महाराष्ट्रासह संपूर्ण देशातील रस्ते चकचकीत झाले आहेत. मेट्रो, मोनोरेलसारख्या सुविधा आल्या आहेत. आज कृषी आणि संलग्न क्षेत्राचा विकास दर जवळपास ८.७ टक्के आहे. देशाच्या विकासात महाराष्ट्राचे योगदान १३ टक्क्यांपेक्षाही अधिक आहे. जे देशातील इतर राज्यांच्या तुलनेत अधिक आहे. गेल्या काही वर्षांत महाराष्ट्राच्या दरडोई उत्पन्नातही मोठी वाढ झाली आहे. महाराष्ट्रासह देशावर विदेशी कर्ज आहे. परंतु, यात आघाडीच्या देशांपेक्षा भारत खूप पिछाडीवर आहे. अमेरिका, चीन, जपान, जर्मनी, कॅनडा यासारख्या देशांवर भारतापेक्षा अधिक कर्ज आहे. परंतु, आंतरराष्ट्रीय गुंतवणूक म्हणजे थेट कर्ज नव्हे, अन्यथा या देशांना श्रीमंत म्हणून नावलौकिक मिळू शकला नसता. त्यामुळे भारतावर खूप कर्ज असल्याची आवई उठविणाऱ्यांनी आकड्यांचा खेळ समजून घेतला पाहिजे.

या कर्जाच्या भरवशावरच चीनसारखा देश बलाढ्य बनू शकला. त्यामुळेच आपल्या सरकारकडून अधिकाधिक विदेशी गुंतवणूक आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. विदेशी गुंतवणूक वाढल्यास सरकारी उत्पन्न वाढते आणि बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होतो. 'सध्याच्या आर्थिक दरवाढीचा विचार करता २०३० पर्यंत आपण एक ट्रिलियन डॉलर्स अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट गाठू आणि २०४७ पर्यंत पाच ट्रिलियन डॉलर्सचे उद्दिष्ट साध्य करू,' असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी दिला आहे. नवीन औद्योगिक धोरणांतर्गत, उत्पादन क्षेत्राचा जीडीपी २० टक्क्यांपर्यंत वाढविण्याचे सरकारचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले. मुंबई केवळ महाराष्ट्राची राजधानी नाही, तर देशाची आर्थिक राजधानीसुद्धा आहे. जवळपास सर्वच प्रमुख बँका, वित्तीय संस्था, विमा कंपन्या आणि म्युच्युअल फंड आदींची मुख्यालये मुंबईत आहेत.

राष्ट्रीय औद्योगिक उत्पादनात २० टक्के योगदान देणारे महाराष्ट्र हे दुसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. राज्यातील अनेक शहरांमध्ये सॉफ्टवेअर पार्क आहेत आणि महाराष्ट्र ८० हजार कोटींहून अधिक वार्षिक निर्यातीसह सॉफ्टवेअरचे दुसरे सर्वांत मोठे निर्यातदार राज्य आहे. परंतु, अशाही परिस्थितीत कार्यरत वयोगटातील २५ टक्के लोकसंख्या शेती व संलग्न व्यवसायांवर अवलंबून आहे. अशा परिस्थितीत महाराष्ट्राला ५ ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था करायचे असेल तर नवी कृषिक्रांती घडवून आणावी लागेल. एकूणच शेतकऱ्यांचे उत्पादन आणि उत्पन्न वाढल्याशिवाय सरकारचा संकल्प पूर्ण होऊ शकत नाही, हेच अंतिम सत्य आहे.

९८८१७१६०२७

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# हिंदू साम्राज्य दिवस

महाराष्ट्रात मुघल साम्राज्याची पाळेमुळे खोलवर गेलेली होती. त्याला जवळपास ३०० वर्षांचा कालावधी झालेला होता. त्यामुळे इथल्या भाषा, भूषा, भोजन, भवन, भेषज म्हणजे औषध या सर्वांबरोबरच जनजीवनावरही बऱ्याच प्रमाणात प्रभाव झालेला होता. मुलांची नावे सुद्धा पिराजी, शहाजी अशा पद्धतीची ठेवली जायची. लोकांच्या बोली भाषेमध्ये फारसी व उर्दू शब्द सुद्धा सहजपणे बोलले जायचे. वापरात असलेली चलनी नाणी ही सुद्धा मुघलांची होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी विजेत्यांचा हा प्रभाव समाप्त करण्यासाठी त्या काळात सर्वत्र रूढ असलेले फारसी, उर्दू शब्द राजव्यवहारातून काढून टाकले व राजव्यवहार कोशाची निर्मिती केली. इंग्रजांनी दिलेली गुळगुळीत नाणी बनवून देण्याचा प्रस्ताव छत्रपती शिवाजी महाराजांनी नाकारला व स्वत:ची चलनी नाणी सुरू केली. ही महाराजांची स्वदेशी दृष्टी होती.

छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक ही इतिहासातील एक अनोखी स्फूर्तिदायक घटना होती. ३०० वर्षांपेक्षा अधिक कालखंडापासून महाराष्ट्रावर वेगवेगळ्या बादशहांचे राज्य होते. लोकांनी गुलामी मानसिकतेने स्वीकारलेली होती. हिंदूंची जागा फक्त बादशहाची चाकरी करण्यातच आहे अशा पद्धतीची विचारसरणी ही मोठमोठ्या शूरवीर, पराक्रमी लोकांची होती. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य उभे करण्याचा केलेला प्रयत्न हा इतिहासाला सुद्धा नवीन होता. ही चौकटीबाहेरची विचारसरणी होती.

गुलामगिरी इतकी रक्तात भिनलेली होती की कुठलाही राजा स्वत:चा राज्याभिषेक करून घेणे हा अपराध समजत होता. स्वत:चा राज्याभिषेक करणे म्हणजे बादशाही सत्तेला आव्हान देण्यासारखे होते. त्यामुळे कोणी राज्याभिषेक करायला धजावत नव्हता. यामुळेच की काय धार्मिक ग्रंथांमध्ये सुद्धा राज्याभिषेक विधी हा सुद्धा दिसेनासा झालेला होता. छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक करण्यासाठी काशीवरून त्यावेळेसचे अत्यंत विद्वान गागाभट्ट यांना बोलविण्यात आले होते. देशातील विविध साधुसंतांनी सुद्धा छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला आपले आशीर्वाद पाठविले होते.

रामदास स्वामी यांनी संपूर्ण भारताची एकेकाळी यात्रा केली होती. त्या यात्रेमध्ये हिंदूंवर चाललेले बादशाही मुघल सत्तेचे अत्याचार त्यांनी स्वत: आपल्या डोळ्यांनी पाहिलेले होते. समाजाची परिस्थिती आणि महिलांवर होणारे अत्याचार व्यक्त करताना ते म्हणतात ''किती गुजरणी ब्राह्मणी भ्रष्ट विल्या, किती एक देशांतरी त्या विकिल्या, किती सुंदरा हाल होऊनी मेल्या ।'' त्यावेळेस त्यांनी समाजाचे वर्णन ''धर्म बुडाला''अशा पद्धतीचे केलेले होते. परंतु त्या परिस्थितीपासून तर शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकापर्यंत छत्रपती शिवाजी महाराजांमुळे समाजामध्ये इतका स्वाभिमान व सामर्थ्य निर्माण झाले की त्याच संत रामदास स्वामींना असे लिहावे लागले की ''बुडाला औरंग्या पापी, म्लेंच्छ संहार झाला'' आणि ''उदंड झाले पाणी, स्नानसंध्या करावया ।'' रामदास स्वामींनी आपल्या रचनांमध्ये त्या त्या वेळेच्या सामाजिक परिस्थितीचे वर्णन केलेले आहे. परंतु धर्म बुडालापासून ते उदंड झाले पाणी, स्नानसंध्या करावयापर्यंत एक मोठे सामाजिक स्थित्यंतर झालेले आपल्याला दिसून येते. अर्थातच याचे श्रेय छत्रपती शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाला जाते.



छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला इंग्रज, पोर्तुगीज यांचे प्रतिनिधी सुद्धा उपस्थित राहिले होते. राज्याभिषेकासाठी संपूर्ण देशातील सर्वच पवित्र नद्यांचे जल आणण्यात आले होते. छत्रपती शिवाजी महाराजांची स्वत:चा राज्याभिषेक करण्यामागे जी दृष्टी होती ती केवळ महाराष्ट्रापुरते आपले स्वराज्य असावे अशी नव्हती तर त्यांना आसेतुहिमाचल हिंदवी स्वराज्य विस्तारित करायचे होते. पोर्तुगालची राजधानी लिस्बन येथील एका लेखागारात पत्र उपलब्ध आहे, ज्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज म्हणतात की, सिंधू नदीच्या उगमापासून ते कावेरीच्या दक्षिण तटापर्यंत पसरलेली ही भूमी आमची आहे. या भूमीतून विदेशी आक्रमकांना पळवून लावणे आणि उद्ध्वस्त झालेली सर्व मंदिरे, देवस्थाने यांना पुन्हा प्रस्थापित करणे यासाठी आपला हा सगळा उद्योग आहे असा उल्लेख त्या पत्रामध्ये आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे हे स्वप्न अनेक वर्षांनंतर पेशव्यांच्या काळात जेव्हा अफगाणिस्तानातील अटक नदीच्या पलीकडे मराठ्यांचा भगवा झेंडा रोवला गेला त्यावेळेस साम्राज्य विस्ताराच्या बाबतीत खरे ठरले. छत्रपती शिवाजी महाराजांनी राजा व्हावे ही साधुसंतांची इच्छा होती. ही इथल्या गोरगरीब जनतेची इच्छा होती. संपूर्ण हिंदुस्थानची इच्छा होती की हिंदूंचे राज्य देशामध्ये कुठेतरी उभे राहावे व हिंदूंचा कोणीतरी राजा व्हावा. प्रजेला रक्षकाची आवश्यकता होती. प्रजेला नेतृत्वाची आवश्यकता होती. देशामध्ये चालणाऱ्या बादशाह्यांना सुद्धा हिंदूंचे राज्य आहे याची जाणीव करून देणे आवश्यक होते. कोणीही यावे आणि टपली मारून जावे असा समाज हिंदू समाज नाही तर त्याचाही रक्षणकर्ता आहे. त्यांचेही स्वतःचे राज्य आहे ही जाणीव सर्वांनाच करून देणे आवश्यक होते. म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वत:ला राज्याभिषेक करून घेणे स्वीकारले.

१६४६ ते १६७४ या २८ वर्षांमध्ये केलेल्या प्रयत्नांचा परिपाक म्हणजे शिवराज्याभिषेक होता. आजपर्यंत भारतामध्ये अनेक राजे झाले, परंतु छत्रपती शिवाजी महाराजांना जनतेने ईश्वराचा अंश मानले. हिंदू या देशाचे राजे होऊ शकतात या विचाराची सुरुवात म्हणजे शिवराज्याभिषेक आहे. शिवराज्याभिषेकामुळे केवळ महाराष्ट्रातीलच जनतेला आनंद झाला नाही, तर आसेतुहिमाचल पसरलेल्या या भारत भूमीमध्ये राहणाऱ्या, विविध भाषा बोलणाऱ्या परंतु सनातन धर्माला मानणाऱ्या सर्वच लोकांना आनंद झाला. छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक ही महाराष्ट्रापुरती मर्यादित घटना नव्हती तर ही एक अखिल भारतीय घटना होती. म्हणूनच शिवराज्याभिषेक हा हिंदू साम्राज्य दिवस आहे. ही इतिहासातील एक अनोखी मोठी घटना होती. ही घटना ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी ६ जून १६७४ रोजी घडली. आज या घटनेला ३५१ वर्षे पूर्ण झाली आहेत. मुघलांच्या दडपशाहीला उत्तर देणारा, न्यायकुशल राजा आमच्या महाराष्ट्रात होऊन गेला. ज्याने संपूर्ण देशाला प्रेरणा दिली ही आमच्याकरिता निश्चितच अभिमानाची व आनंद साजरा करण्याची गोष्ट आहे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### मुलींच्या आई-वडिलांनी जबाबदारी झटकू नये

दोन दिवसांपूर्वी पेपरमध्ये बातमी वाचली की एका तरुणीने गळफास लावून आत्महत्या केली. तिच्या लग्नाला फक्त ३५ दिवस झाले होते. सासरचे लोक तिला हुंडा आणल्याबद्दल त्रास देत होते. ही गोष्ट तिने आपल्या माहेरी सांगितली होती. पण तिच्या माहेरच्यांनी ही तक्रार गांभीर्याने घेतलेली नाही असे वाटते. एक कोवळ्या वयातील तरुणी लग्नानंतरचे स्वप्न पाहते.

नवीन सासरच्या घरी रुळायचा प्रयत्न करते. ज्या नवऱ्याबरोबर सात फेरे घेतले त्याच्यावर संपूर्ण विश्वास टाकते, तोच तिचा काळ ठरतो. हुंडारूपी यम तिचा पाठलाग करतो आहे याची तिला जाणीवही नव्हती. कायदा तिच्या सासरच्या लोकांना शिक्षा करेल तोपर्यंत बराच काळ निघून गेलेला असेल. कालाय तस्मै नम: या युक्तीनुसार काही दिवसांत ही हुंडाबळी लोकांच्या विस्मरणात जाईल. पण येथे सासरचाच विचार करून चालणार नाही. ज्या आई-वडिलांनी तिला वाढवले त्यांचीही यात मोठी चूक आहे. त्यांनी तिची तक्रार गांभीर्याने घेतलेली दिसत नाही असे खेदाने म्हणावे लागेल. आपली मुलगी त्यांना इतकी जड होते की लग्न करून दिले की आपली जबाबदारी संपली असा (गैर)समज करून घेतात. माहेरचे दार तिला का बंद करायचे? अशा परिस्थितीत ती एकटी काय करेल? हळव्या मुली शेवटी आत्महत्या करतात किंवा अशा कृत्यासाठी त्यांना प्रवृत्त केले जाते. का नाही आई-वडील तिला विश्वास देत की कितीही कठीण परिस्थिती येवो आम्ही तुझ्या पाठीशी आहोत. आमचे दार तुझ्यासाठी सदैव उघडे आहे. शेवटी जन्मदात्या आई-वडिलांची जबाबदारी कधीच संपत नसते.

**राजेंद्र वाडी**/नागपूर

●● ●●

### देशात देखील 'ऑपरेशन सिंदूर'चा प्रचार गरजेचा

पहलगाममधील निरपराध २६ पर्यटकांना हिंदू असल्याची खात्री करून पाकपुरस्कृत दहशतवाद्यांनी गोळ्या घालून ठार केले. भारताने 'ऑपरेशन सिंदूर'मधून त्याला चोख उत्तर दिले. पाकिस्तानात घुसून दहशतवाद्यांचे अड्डे नष्ट केले. विविध पक्षांच्या खासदारांचे शिष्टमंडळ तयार करून इतर देशांत पहलगाम हल्ल्यास भारताने दिलेले चोख प्रत्युत्तर याची माहिती जगातील सर्व राष्ट्रांना देण्यासाठी पाठविण्यात आले. जगातील दहशतवाद संपविण्यासाठी भारताने टाकलेले हे महत्त्वाचे पाऊल आहे. परंतु राष्ट्रभक्ती आणि देशप्रेम या जोरावरच देशाला स्वातंत्र्य मिळाले. अजून देखील मोठ्या प्रमाणावर पाकप्रेमी या देशात आहेत.

देशातील काही व्यक्ती देशातील मंदिरे, तसेच संवेदनशील महत्त्वाची गोपनीय माहिती शत्रुराष्ट्राला पुरवीत आहेत. यामुळे दहशतवादी कारवायांना देशातूनच खतपाणी घातले जाते. त्यासाठी देखील 'ऑपरेशन सिंदूर' अभियान राबविले पाहिजे. म्हणूनच देशातील सर्व राज्यांमधील आमदार, खासदार इत्यादी लोकप्रतिनिधींनी देशप्रेम आणि राष्ट्रभक्तीच्या वाढीसाठी आपापल्या भागात सतत प्रयत्न करणे गरजेचे आहे. शत्रुराष्ट्राला देशातील कोणतीही माहिती पुरविणाऱ्या आणि पाकधार्जिणे तसेच देशविरोधी वक्तव्य करणाऱ्या कितीही मोठी व्यक्ती किंवा पक्ष असेल तरीही त्याच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा.

**ॲड. बळवंत रानडे**/९८८१४७३५८०

●● ●●

### शिक्षण खात्यातील बोगस भरती घोटाळा : जबाबदार कोण?

सध्या बोगस शिक्षक भरती घोटाळा गाजत आहे. संस्थाचालक, खात्यातील अधिकारी आणि काही राजकीय पाठबळ असलेले लोक यांच्यातील अभद्र युतीमुळे हा महाघोटाळा घडला. २०११ ते २०१८ दरम्यान अनेक शिक्षक बनावट दस्तावेजांच्या आधारावर नेमले गेले. हे शिक्षक शाळेत गेलेही नाहीत, तरी त्यांचे वेतन नियमित सुरू होते. हे पैसे शिक्षण खात्यातील अधिकाऱ्यांनी व संस्थाचालकांनी वाटून घेतले. शालार्थ प्रणालीतील त्रुटी, ओटीपीशिवाय आयडी तयार होणे, यासारख्या गंभीर तांत्रिक दुर्लक्षामुळे यंत्रणेचा गैरवापर झाला. इतक्या वर्षांनी हे प्रकरण उघडकीस येते, म्हणजेच तपास यंत्रणांची कार्यक्षमता आणि इच्छाशक्ती दोन्हीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पोलिसांकडे यादी असूनही संस्थाचालकांवर कारवाई होत नाही. काही अटकेत आहेत, पण सूत्रधार मोकाट आहेत. या सगळ्या प्रकारात विद्यार्थ्यांचे, शिक्षक व्यवसायाचे आणि समाजाच्या मूल्यव्यवस्थेचे मोठे नुकसान झाले आहे. आता तरी सरकारने निव्वळ चौकशी जाहीर न करता ती तत्काळ व निष्पक्षपणे पार पाडावी. दोषींना शिक्षा होईपर्यंत हा विषय सोडू नये, अन्यथा ही भ्रष्टाचाराची साखळी अधिक मजबूत होईल.

**अरुण कराळे**/९०९६३२६२७२

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# नाळवंडी ग्रामस्थांचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन

## रोजगार हमी, पंधराव्या वित्त आयोगाच्या बोगस कामांची चौकशी करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ जून**

तालुक्यातील नाळंडी येथे रोजगार हमी योजना आणि पंधराव्या वित्त आयोगाच्या आणि जि[illegible]र्षिक योजने अंतर्गत अ[illegible]गस कामे झालेली आहेत. सरपंच, ग्रामसेवक आणि शासकीय अधिकारी यांनी संगनमत करून मोठा भ्रष्टाचार केलेला आहे. याबाबत वारंवार तक्रार करूनही प्रशासन याची दखल घेत नसल्याने सोमवार (दि.९) रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करून झालेल्या बोगस कामांची चौकशी करण्याची मागणी केली.



रोजगार हमी योजना, पंधरावा वित्त आयोग आणि जिल्हा वार्षिक योजनेच्या कामासंदर्भात नाळवंडी गावात अनेक गैरप्रकार झाले आहेत. रोजगार हमी योजनेतून अगोदरच झालेली कामे दाखवून, कामांची नावे बदलून नाळवंडी ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामसेवक आणि शासकीय अधिकारी यांनी लाखोंचा अपहार केला आहे. बोगस कामे करत शासनाची आणि जनतेची मोठी फसवणूक केली आहे. याबाबत नाळवंडी गावचे माजी सरपंच राधाकिशन म्हेत्रे आणि ग्रामस्थ यांनी वारंवार तक्रारी केल्या आहेत. परंतु यावर प्रशासनाकडून कसल्याही प्रकारची कारवाई करण्यात आलेली नाही. अनेक वेळा निवेदने, तक्रारी देऊनही कारवाई होत नसल्याने नाळवंडी ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले. सदरील कामांचे कोणतेही बील अदा करण्यात येऊ नये. सदरील कामांची सखोल चौकशी करून याप्रकारामध्ये सहभागी असलेल्या सरपंच, ग्रामसेवक आणि शासकीय अधिकारी यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी. अशी मागणी यावेळी नाळवंडी गावच्या आंदोलनकर्त्या नागरिकांनी केली आहे.



राज्यसभेच्या सदस्य प्रा.डॉ. खा. मेधाताई कुलकर्णी यांनी द्वादश पंचम् ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेतले यावेळी त्यांचे स्वागत करण्यात आले.उपस्थिती बाजीराव धर्माधिकारी,राजेश देशमुख,प्रदीप देशमुख,नितीन कुलकर्णी,अजय जोशी जीवन देशमुख यांच्यासह अनेक पदाधिकारी

# श्री संस्कार इंग्लिश स्कूलच्या नवीन इमारतीचा उद्घाटन सोहळा

## श्री संस्कार इंग्लिश स्कूल चे पालकत्व स्विकारणार-खा.सोनवणे


**तभा वृत्तसेवा**
**केज दि.९ जून**

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील श्री संस्कार इंग्लिश स्कूल या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे ईंग्रजी शिक्षण देण्यासाठी नव्याने सुरू झालेल्या व अल्प कालावधीतच नावलौकिक मिळविलेल्या श्री संस्कार इंग्लिश स्कूल च्या इमारतीचे उद्घाटन शनिवारी दुपारी १२.३० वाजता बीड जिल्ह्याचे दबंग खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या हस्ते संपन्न झाले.

या वेळी बोलताना खासदार बजरंग बप्पा सोनवणे म्हणाले लोकसभा मतदार संघाचे पालकत्व स्विकारले आहे त्यामुळे मोठी जबाबदारी आहे. त्यामुळे संपर्कासाठी वेळ मिळत नाही परंतु चिंचोलीमाळी व विडा जिल्हा परिषद सर्कलचे उपकार जन्मभर विसरणार नाही कारण मला या सर्कल मधुन सातत्याने मताधिक्य दिले असून जिल्हा परिषद मध्ये काम करण्याची संधीमिळाली आहे. तसेच श्री संस्कार इंग्लिश स्कूलचे देखील पालकत्व स्वीकारले आहे व शाळेच्या विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले

यावेळी या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून बीड जिल्ह्याचे खासदार श्री. बजरंग सोनवणे हे उपस्थित होते. तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी सौ.रोहिणीताई सुनील देशमुख सरपंच चिंचोलीमाळी या होत्या. तर प्रमुखपाहुणे म्हणून मा.आ.सौ.संगिताताई ठोंबरे, सौ.मनिषाताई कुपकर, गट शिक्षण अधिकारी लक्ष्मण बेडसकर, ह.भ.प. भगवान महाराजशास्त्री, ह.भ.प.पुरुषोत्तम महाराज गिरी, पोलिस निरीक्षक वैभव पाटील, शिवाजी दादा ठोंबरे,भाई, मोहन गुंड, गोविंद नाना शिनगारे, अरविंद भैय्या थोरात, चत्रभुज खोडसे, पिंटु ठोंबरे, भाऊसाहेब गुंड, बाळासाहेब गाढवे सौ.शितलताई लांडगे, ज्ञानेश्वर चवरे, ह.भ.प.सुनील महाराज गालफाडे, बापुसाहेब भुसारी, शिवाजी चाटे, मंजुलदास भिसे, नितीन सुरवसे, गणेश सत्वधर, संदिप जोशी, आबा महाराज मेहरकर आदीमान्यवर यावेळी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले.खा.बजरंग सोनवणे यांच्या हस्ते नुतन इमारतीची फित कापून उद्घाटन संपन्न झाले. विविध क्षेत्रातील मान्यवरांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. याकार्यक्रमा साठी समस्त गावकरी मंडळी,मित्र परिवार, पत्रकार, विविध शिक्षण संस्था चालक, कॉम्प्युटर संस्था



चालक व विविध क्षेत्रातील मान्यवर यावेळी आवर्जून उपस्थित होते.प्रमुख पाहुणे यांनी श्री संस्कार इंग्लिश स्कूलच्या सर्व टीमला शुभेच्छा दिल्या. सुरसंगम कला पथक यांनी उत्कृष्ट गितांचे सादरीकरण अनिल वैरागे, स्नेहलताई यांनी केले.

यावेळी बप्पा चंदनशिव, दिलीप तात्या देशमुख, अरुण काळे, शिवाजी गायकवाड, शहाजी अप्पा गलांडे, भुजंग गलांडे, चंद्रकांत भुजबळ, धिरज वनवे, रामराजे नखाते, गुलाब पठाण, अनिल राऊत, सचिन राऊत, रविराज कापरे, रामदास सपाटे, प्रमोद नखाते पत्रकार चंद्रकांत पाटील, रविंद मेटे, जोतिराम सावंत, सचिन साखरे, पांडुरंग कसबे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षीका पुजा देशमुख, सोनाली खंदारे, निलम जोगदंड, रेश्मा गायकवाड, प्रियंका शिंदे, यांनी विशेष परिश्रम घेतले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष अनिल गलांडे केले तर आभार प्रदर्शन प्रिन्सिपल सिमा काळे यांनी केले.

## श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे बुधवार रोजी केशव म.चावरे यांचे कीर्तन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ जून**



विसाव्या शतकातील महान संत किसनबाबा यांच्या २७ व्या वर्षातील दहावी पुण्यतिथी जेष्ठ शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प.केशव महाराज चावरे अण्णा वारकरी मंडळ मराठवाडा अध्यक्ष यांचे बुधवार दि.११ जून २०२५ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत कीर्तन होणार आहे. तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे अवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व समस्त गावकरी मानकुरवाडी यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरू होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल.

# खा.सोनवणेंनी लक्ष घातले अन् चिंचोलीमाळी सबस्टेशनला मिळाले रोहित्र

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.९ जून**



चिंचांगली माळी येथील सबस्टेशन येथे ५ एमव्हीए क्षमतेचे ट्रान्सफार्मर बसविण्याची मागणी शेतकऱ्यांकडून आल्यानंतर खा.बजरंग सोनवणे यांनी महावितरण विभागाचे मुख्यअभियता लातूर यांना पत्र लिहले होते. यानंतर दि.९ रोजी याठिकाणी रोहित्र मिळाले असून याबाबत ग्रामस्थांनी आभार मानले आहेत.

चिंचोली माळी येथे महावितरणचे सबस्टेशन आहे. मात्र, कमी क्षमतेच रोहित्र याठिकाणी असल्याने अनेकदा अडचणीचे ठरत होते. सदरील ठिकाणी ५ एमव्हीए क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर मिळवून देण्यात यावे, अशी ग्रामस्थ आणि परिसरातील शेतकऱ्यांची मागणी होती. दरम्यान, यासाठी खा.बजरंग सोनवणे यांनी महावितरणचे मुख्य अभियंता यांना पत्र देऊन सदरील काम मार्गी लावावे, असे म्हटले होते. यानंतर ५ एमव्हीए अतिरिक्त पॉवर रोहित्रचे काम करण्यासाठी लागणाऱ्या परवानग्या देण्यात यावा, अशा सुचनाही देण्यात आल्या होत्या. सदरील कामाची

### सबस्टेशनला मिळाले ५ एमव्हीए क्षमेचे ट्रान्सफार्मर

प्रशासकिय मान्यता आल्यानंतर परवानग्यांचा विषय समोर आला होता. यातही खा.बजरंग सोनवणे यांनी पाठपुरावा केला. यानंतर दि.९ जून रोजी रोहित्र बसविण्यात आले. आता रोहित्र बसविल्याने उच्च दाबाने विद्यूत पुरवठा होणार आहे. शिवाय शेतकऱ्यांनाही याचा मोठा फायदा होणार आहे. दरम्यान, खा.सोनवणे यांनी शेतकऱ्यांच्या विषयात लक्ष घालून बारकाईने पाठपुरावा केल्याबद्दल शेतकऱ्यांनी आभार मानले आहेत.

# शेतकऱ्यांची कर्जमाफी करुन मराठवाड्याला समन्यायी पाण्याचे वाटप झाले पाहिजे - भाई जयंत पाटील

### मराठवाड्यात नवीन युवकांना काम करण्याची संधी मिळणार

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.९ जून**

मराठवाडा सातत्याने दुष्काळी झळा सहन करत असतो, तर पश्चिम महाराष्ट्र सह इतर काही भागात महापुरामुळे गावेची गावे पाण्याखाली येतात. वास्तविक मराठवाड्याचे हक्काची समन्यायी पाण्याची मागणी अनेक दिवसांपासून असताना देवेंद्र फडणवीस आणि भाजपचे काही लोक केवळ मराठवाड्याला समन्यायी पाणी करण्याच्या केवळ वल्गाणा करून मराठवाड्यातील जनतेला वेड्यात काढण्याचे काम करत आहेत ही बाब शेतकरी कामगार पक्ष कदापी खपवून घेणार नाही तर मराठवाड्याला समन्यायी पाणी वाटप झाल्याशिवाय शेतकरी कामगार पक्ष स्वस्थ बसणार नाही अशी



घोषणा शेतकरी कामगार पक्षाचे नेते सरचिटणीस भाई जयंत पाटील साहेब यांनी केली. पक्ष बांधणी संदर्भात नवीन चेहऱ्यांना संधी देणार असल्याचे वक्तव्य जयंत पाटील यांनी बोलुन दाखवले.

मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते प्रा एस व्ही जाधव होते कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून पक्षाचे सहचिटणीस भाई बाबासाहेब देवकर, महिला आघाडीच्या ड मानसी म्हात्रे ,भाई बाबुरावजी लागारे ,चित्रलेखा गोळेगावकर नारायण गोले पाटील, भाई उदय गवारे, विष्णुपंत घोलप, ॲड.गोविंद डुमणे, बाळासाहेब धस यांनी मनोगत व्यक्त केले. या वेळी, तुषार गोळेगावर ,किरण खपले, अमोल दिक्षीत, उत्तम अमृतराव, सुशिल सोमवंशी, राजाराम रसाळ, आसद बल्खी, शिवाजी सुरवसे, राजु सुरनर, यांची उपस्थिती होती कार्यक्रमाचे प्रास्ताविक मेळावा समन्वयक भाई मोहन गुंड यांनी केले, सुत्रसंचलन हनुमंत घाडगे सर यांनी केले

तर आभार प्रा उमाकांत राठोड यांनी केले. अशोक रोडे ड निखिल बचुटे मुंजा पांचाळ मंगेश देशमुख यांनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले.केजध्ये शेतकरी कामगार पक्षाच्या विभागीय मेळाव्याच नियोजन कमी वेळात मोहन गुंड टिमणे केलं याचं कौतुक पक्षाच्या वरिष्ठांनी केले, सर्वांशी संपर्क असणाऱ्या मोहन गुंड यांना पक्षाने जबाबदारी द्यावी आस कार्यकर्ते बोलून दाखवत होते, त्यामुळे लवकरच मोहन गुंडवर जिम्मेदारी पडेल कालच्या मेळाव्यातुन दिसून आले.

# पेट्रोलिंग करतांना वाळूचे ट्रॅक्टर पकडले



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ जून**

आज दिनांक ०९/०६/२०२५ रोजी रात्री ०१.०० वाजता चे सुमारास रात्रगस्त पेट्रोलिंग करत असताना पोलीस नाईक मोहसीन शेख यांना गोपनीय बातमीदार यांच्याकडून माहिती मिळाली की, मौजे गोळेगाव येथे अवैद्य रित्या वाळू ट्रॅक्टर मध्ये भरून जात असल्याची माहिती मिळाल्यावरून सदर ठिकाणी जाऊन ट्रॅक्टरचा पाठलाग करून वाळू भरलेल्या ट्रॅक्टर गोळेगाव शेत शिवारात पकडला. सदर वाळूने भरलेल्या ट्रॅक्टर पोलीस ठाणे तलवाडा येथे आणून पोलीस नाईक मोहसीन शेख यांनी सरकार तर्फे फिर्याद दिली आहे. सदर वाळूने भरलेला ट्रॅक्टर एकूण ५,०५,०००/पाच लाख पाच हजार रुपये मुद्देमाल करण्यात जप्त करण्यात आला आहे. तसेच पुढील तपास तलवाडा पोलीस पोह/४०२ मस्के करीत आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कावत सर, अपर पोलीस अधीक्षक सचिन पंडकर सा.,पोलीस उप अधीक्षक मीना साहेब, सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज निलंगेकर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक मोहसीन शेख व अमोल औसरमल यांनी केली.

# छत्रपती साखर कारखाण्याचा ऊस बिलाचा हप्ता २७०० रुपयाने बँकेत वर्ग

## व्हा.चेअरमन मोहनराव जगताप

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.९ जून:**



सावरगाव येथील छत्रपती सहकारी साखर कारखान्याने चालू गाळपातील उसाचा पहिला हफ्ता दोन हजार सातशे रुपयांनी बँकेत वर्ग केला आहे.छत्रपती सहकारी साखर कारखाना सोनाजीनगर सावरगाव ता. माजलगाव जिल्हा बीड या कारखान्याने गळीत हंगाम २०२४-२५ मधील दि. २७/११/२०२४ ते दि. १५/१२/२०२४ पर्यंत एकूण ४४९४१.८६८ मे. टन उसाचे गाळप केले असून त्याचे बिल २७००/- रुपये प्रति टना प्रमाणे एकूण रक्कम १२१३४३०८७/- रुपये बँकेत वर्ग केले आहेत.

तसेच कारखान्याचे कार्यक्षेत्रातील उसाचे गाळप करण्यासाठी कारखाना प्रशासनाने योग्य पद्धतीने नियोजन करून उसाचे गाळप करीत आहे व योग्य वेळी सर्व शेतकऱ्यांचे बिल बँकेत जमा केली आहेत.

कारखान्याचे चेअरमन मा.श्री.बाजीराव सोनाजीराव जगताप व सर्व संचालक मंडळ यांनी कारखान्याचे गाळप क्षमता कमी असताना सुद्धा शेतकऱ्यांचे हित जपत व कारखान्याकडे कुठलेही उपपदार्थ नसताना सुद्धा योग्य भाव देऊन नियोजन करून गाळप करण्यास कठिबद्ध आहे. तरी भागातील शेतकऱ्यांनी आपला ऊस कारखान्यास देऊन सहकार्य करावे व ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आपापली बीले आपल्या भागातील संबंधित बँकेस संपर्क साधून बीले जमा करून घ्यावेत अशी विनंती कारखान्याचे व्हा. चेअरमन मोहनराव जगताप यांनी केली आहे.



# माजलगावात शिक्षणाचा नवा अध्याय

## आयुष ग्लोबल इंग्लिश स्कूलची अत्याधुनिक इमारत पालकाच्या सेवेत



**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.९ जून**

येथील आयुष ग्लोबल इंग्लिश स्कूलच्या नव्या अत्याधुनिक इमारतीचा उद्घाटन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष मोहनदादा जगताप यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे होते. यावेळी लतीफ मोमीन (सरपंच, पात्रूड), घनश्याम दादा भूतड़ा, एकनाथ मस्के, सुरेंद्रजी रेदासणी,माजी जि प सदस्य बबनराव सत्यदे रामानंदजी लड्डा, उमेशकुमार जेथलिया,अविनाश गोंडे, शरद यादव तसेच परिसरातील गावांतील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली होती.

कार्यक्रमात बोलताना मान्यवरांनी सांगितले की, शाळा म्हणजे केवळ इमारत नसून, ती ज्ञानमंदिर आहे. नवी इमारत म्हणजे आशा, स्वप्ने आणि शिक्षण या मूल्यांवर उभी राहिलेली विश्वासाची वास्तू आहे. सागर करवा आणि सौ.भाग्यश्री करवा यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान, समर्पण आणि दूरदृष्टी याबद्दलही विशेष उल्लेख करत, त्यांच्यामुळे आयुष लोबल इलिश स्कूलची नीती आणि मूल्ये दृढ झाल्याचे त्यांनी नमूद केले. नबीन इमारतीचे उद्घाटन हे समाजाला दर्जेदार शिक्षण देण्याच्या दिशेने एक महत्वाचे पाऊल असल्याचे सर्व मान्यवरांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आपश्यक असलेली साधने आणि संधी देंगे हे शाळेचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे मत त्यांनी मांडले. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी शाळेचे संचालक सागर करवा यांनी सांगितले की, नवीन इमारत ही आधुनिक सुविधांनी परिपूर्ण आहे. सर्व वर्गखोल्या प्रशस्त व डिजिटल आहेत.

ऑनलाईन लर्निंगच्या साहाय्याने शिक्षण अधिक प्रभावी व आकर्षक होईल. शाळेत संगणक व सुसज्ज प्रयोगशाळा, मुलांसाठी प्रशस्त खेळाचे मैदान, शारीरिक व मानसिक विकासासाठी अनुकूल वातावरण, हे सर्व विद्यार्थ्यांच्या भविष्य घडवण्यासाठी उपयुक्त आहे असे त्यांनी नमूद केले. शाळेच्या आधुनिक शिक्षणपद्धती आणि धोरणांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास सुनिश्चित केला जातो. सौं भाग्यश्री सागर करवा यांनी पालकांना आधासन दिले की, आयुष ग्लोबल स्कूलचा संपूर्ण परिवार मुलांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी आणि सर्वांगीण विकासासाठी सदैव कटिबद्ध राहील. सर्व मान्यवर, पालक आषि उपस्थित पाहुण्यांचे मनःपूर्वक आभार मानले. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन अशोक वाडेकर यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक-शिक्षिका यांनी परिश्रम घेतले.

# वृक्ष लागवडीच्या नावाखाली वनविभागाचा ढोंगीपणा

**तभा वृतसेवा**
**किनवट , दि.०९ जून -**

मांडवी वनपरिक्षेत्राअंतर्गत उमरी बाजार परिसरात शेतीच्या बांधावर आणि ओढ्यांवर असलेल्या वृक्षांची अवैध कत्तल जोरात सुरू आहे. बामनगुड ते रामपूर आणि चिंचखेड ते उमरी बाजार रस्त्यांवर कोवळ्या वृक्षांपासून ते सागवान, बांबू, कडूलिंब, चारोळी, हिरडा, बेहडा, चिंच, बाभूळ, अंजन, खैर, मोहा, महारुख यांसारख्या मोठ्या वृक्षांची बेसुमार तोड करून त्यांची गट्टू बनवली जात आहेत. ही गट्टू हॉटेल व्यावसायिकांना चढ्या भावाने विकली जात असून, रस्त्यांवर अवैध साठवणूकही दिसत आहे. मात्र, मांडवी वनविभाग याकडे पूर्णपणे डोळेझाक करत असून, कोणतीही चौकशी किंवा कारवाई केली जात नाही.



किनवट तालुका एकेकाळी हिरव्यागार जंगलांनी नटलेला होता. शेतकऱ्यांनी बांधांवर मोठ्या जप्तनं वृक्ष लावून शेतीचं रक्षण केलं होतं. पण गेल्या काही वर्षांपासून गुत्तेदारांच्या संगनमताने या वृक्षांची कत्तल सुरू आहे. गेल्या महिन्याभरापासून उमरी बाजार परिसरात मोठ्या प्रमाणात वृक्षतोड झाली, तरी वनविभागाने याची दखल घेतलेली नाही. याशिवाय, उन्हाळ्यात मांडवी परिक्षेत्रात लागलेल्या वणव्यात अनेक वृक्ष जळून खाक झाले, पण वनविभागाची निष्क्रियता कायम आहे.

दि. ५ जूनला जागतिक पर्यावरण दिन साजरा करताना वनविभाग आणि इतर कार्यालयांमध्ये वृक्षलागवडीचे फोटोसेशन जोरात चालते. फेसबुक, व्हॉट्सॲपवर हे फोटो शेअर केले जातात, पण लागवलेले वृक्ष जगवण्याकडे कोणाचं लक्ष नाही. राजकीय कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना फक्त फोटोसेशनची हौस आहे, तर वृक्षतोडीवर नियंत्रण आणण्यात ते पूर्णपणे अपयशी ठरले आहेत. वृक्ष लागवडीपेक्षा तोडीचं प्रमाण कित्येक पटींनी जास्त आहे, तरीही अवैध वृक्षतोड करणाऱ्यांवर कारवाई होत नाही. ही वनविभागाची शोकांतिका असुन पर्यावरण दिनाचा केवळ दिखावा आहे की काय अशी शंका उपस्थित होत आहे.

उमरी बाजारातील वृक्षतोडीमुळे वनप्रेमींमध्ये प्रचंड संताप आहे. अवैध वृक्षतोडीला जबाबदार कोण? वनविभाग का झोपला आहे? असा सवाल उपस्थित केला जात आहे. मांडवी वनविभागाच्या निष्क्रियतेमुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत असून, याला जबाबदार असलेल्यांवर तातडीने कारवाईची मागणी जोर धरत असुन अवैध वृक्षतोडीवर कारवाई का होत नाही? वणवे आणि वृक्षतोड रोखण्यासाठी वनविभागाची ठोस योजना काय आहे? पर्यावरण दिनाच्या दिखाव्यापलीकडे वृक्षसंवर्धनासाठी काय पावलं उचलली जात आहेत? वनविभागाच्या ढिसाळ कारभारामुळे किनवटच्या हिरव्या संपदेचा विनाश होत आहे. आता तरी वनविभाग जागा होणार की हा पर्यावरणाचा लिलाव असाच सुरू राहणार? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

# कवळे गुरुजी यांची भायेगाव येथील हणमंते परिवारास सांत्वनपर भेट



**तभा वृतसेवा**
**उमरी , दि.०९ जून -**

हरवलेलं छत्राची आई बनली व्हीपीके पतसंस्था वारस मुलाला दत्तक घेऊन शैक्षणिक खर्चाची घेतली जबाबदारी घेतली तसेच सातारचे व्याही महाराष्ट्र राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मा. ना. मकरंद आबा पाटील यांना भायेगाव येथील झालेल्या दुर्दैवी घटनेची माहिती दूरध्वव्दारे देऊन जिल्हाधिकारी नांदेड व उमरी तहसीलदार प्रशांत थोरात यांना तात्काळ मदत करण्याची सुचना द्यावी अशी केली मागणी भाजपचे नेते मारोतराव कवळे गुरुजी यांनी केली.स्वता सामाजिक बांधिलकी जोपासात आपल्या व्हीपीके पतसंस्थांच्या वतीने मुलांच्या शैक्षणिक खर्चाची जबाबदारी घेतली.

भायेगाव येथील दि.७जून रोजी गोदावरी नदीपात्रात कपडे धुण्यासाठी गेलेल्या मायलेकींसह पुतणीचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. ही घटना तालुक्यातील भायेगाव येथे शनिवारी दुपारी बारा वाजता घडली. महानंदा भगवान हणमंते (वय ३५), पायल भगवान हणमंते (१४), ऐश्वर्या मालू हणमंते (१२) अशी मृतांची नावे आहेत. महानंदा दोघींना घेऊन कपडे धुण्यासाठी नदीवर गेली होती. कपडे धूत असताना बाजूला पाण्यात खेळत असलेली पायल खड्यात बुडायला लागली. आई महानंदाने तिला वाचविण्याचा प्रयत्न केला. मात्र, दोघीही पाण्यात बुडाल्या. यावेळी ऐश्वर्या या दोघींचा हात धरायला गेली. तर तीही पाण्यात बुडाली.ही बातमी समजताच नांदेड जिल्ह्यातील भारतीय जनता पक्षाचे नेते व्हीपीके पतसंस्थेचे चेअरमन मारोतराव कवळे गुरुजी यांनी तात्काळ सांत्वन पर भेट देऊन वारस मुलाला शैक्षणिक खर्चाची जबाबदारी घेत दत्तक घेतले यावेळी गावातील तंटामुक्ती अध्यक्ष आनंदराव पाटील कदम, मधुकर पाटील बोळसेकर, मारोतराव सर्जे, बापूराव पाटील शिंदे, ज्ञानेश्वर पाटील कदम, पतसंस्थेचे सचिव नागनाथ पांचाळ, गोविंदराव पाटील राहटीकर, भगवान कोकणेसह गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त

### शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तक वितरण



**भोकर**-नवीन शैक्षणिक वर्ष २०२५ - २६ ची तयारी पूर्ण झाली असून, शाळेच्या पहिल्याच दिवशी जिल्हा परिषद व अनुदानित खाजगी शाळेतील इयत्ता पहिली ते आठवीच्या सर्व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचे वितरण व नवागताचे स्वागत केले जाणार असल्याची माहिती गटशिक्षणाधिकारी श्री. सुधीर गुट्टे यांनी दिली आहे.तालुक्यात जिल्हा परिषदेच्या १२५ शाळा तर ४३ खाजगी अनुदानित आहेत.या शाळांमध्ये शिकत असलेल्या इयत्ता पहिली ते आठवीच्या एकूण १६८७७ विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके शाळेच्या पहिल्याच दिवशी पाठ्यपुस्तक वितरीत केले आहेत. दरम्यान तालुकास्तरावरून ९७०७२ पाठ्यपुस्तक वितरणाची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाची सुरुवात सुरळीत आणि उत्साहवर्धक व्हावी यासाठी शिक्षण विस्ताराधिकारी सुमन गोणारकर, यांच्या निगराणीत शिक्षण विभागाकडून सर्वोतोपरी उपाययोजना करण्यात आल्या आहेत. शाळा स्तरावर पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छतागृहांची स्वच्छता, शाळा परिसराची साफसफाई, करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या या सूचनांचे अनुपालन शाळेच्या मुख्याध्यापकांकडून करण्यात आले आहे. तालुकास्तरावर पाठ्य पुस्तक वितरणासाठी पाठ्यपुस्तक विभाग प्रमुख जगदीश थडवे यांच्यासोबत विशेष शिक्षक डेव्हिड गॅम्बल सुधांशू कांबळे, अमोल नरवाडे, संतोषी पंतूलवार,आनंद खांडेकर, गजानन खूपसे, अनिता गिरी, नईमा शेख यांनी विशेष प्रयत्न केले. राजकीय पुढारी, समाजकारणातील मान्यवर,शाळाप्रेमी नागरिक, माजी शासकीय कर्मचारी यांच्या हस्ते शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना नवीन पाठ्य पुस्तकांचे वितरण केले जाणार आहे सोबतच शाळेत विद्यार्थ्यांसाठी स्वागत सोहळे ही आयोजित केले जाणार आहेत. पालकांनी या उपक्रमात सक्रीय सहभाग नोंदवावा, तसेच विद्यार्थ्यांना शाळा बाह्य न ठेवता शाळेच्या पहिल्याच दिवशी शाळेत पाठवावे असेही आवाहन गुट्टे यांनी केले.

### नगर परिषदेच्या वतीने शहरात वृक्षारोपणाला सुरुवात



**मुदखेड** -जागतिक पर्यावरण दिवस हा दरवर्षी पाच जून रोजी केला जातो पर्यावरणाच्या संरक्षणासाठी आणि संवर्धनासाठी या दिवशी वेगवेगळे पर्यावरण विषयक जागरूकता आणि कृती कार्यक्रम आयोजित केले जातात त्याच अनुषंगाने एक पेड माँ के नाम या अभियाना अंतर्गत मुदखेड नगरपरिषदेच्या वतीने दि.५ जुन रोजी पासुन अग्निशमन केंद्र उमरी रोड मुदखेड येथे वृक्षारोपणाला सुरुवात करण्यात आली आहे.यावेळी मीराताई गुंडे कार्यालय अधीक्षक, यबल मॅडम, होटकर मॅडम,सुशील खिल्लारे, दिलीप पवार, रमेश सावंत, मोहन कवळे, आकाश बोकेफोड, साहेबराव खंडागळे, लक्ष्मण भांगे,सुनील माळी,यासह इतर नगर परिषद कर्मचारी उपस्थीत होते.

# सेवांतर्गत वरिष्ठ व निवड श्रेणी प्रशिक्षणात शिक्षकांची गैरसोय

**तभा वृतसेवा**
**लोहा , दि.०९ जून -**

शहरातील डी.के.पाटील कॉलेज सायाळ रोड येथील शाळेत तालुक्यातील १२ वर्षे व २४ वर्षे सेवा पूर्ण करणाऱ्या शिक्षकांसाठी सेवांतर्गत वरिष्ठ व निवड श्रेणी प्रशिक्षणास २ जूनपासून सुरुवात झाली आहे. या प्रशिक्षणात प्रशिक्षणार्थी शिक्षकांकडून दोन हजार रुपये नोंदणी शुल्क घेतल्यानंतरही प्रशासनाकडून प्रशिक्षणार्थ्यांची भोजनासह इतर कोणतीही सुविधा प्रशिक्षणस्थळी नसल्याने प्रशिक्षणार्थी शिक्षकांची मोठी गैरसोय होत आहे.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांच्याकडून जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेने प्रशिक्षण २ जून ते १२ जूनपर्यंत चालणार आहे, या प्रशिक्षणासाठी तालुक्यातील सर्व व्यवस्थापनातील १२ वर्षे व २४ वर्षे पूर्ण करणाऱ्या शिक्षकांना हे प्रशिक्षण देण्यात येत आहे. या प्रशिक्षणासाठी प्रशिक्षण घेणाऱ्या शिक्षकाकडून दोन हजार रुपये ऑनलाईन नोंदणी शुल्क राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांनी घेतले आहेत. दहा दिवस होणाऱ्या प्रशिक्षणात चहा, नाश्ता, भोजन, अल्पोपाहार तसेच पेन, वही या बाबी प्रशिक्षणार्थी शिक्षकांना देण्याचे असताना, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे अक्षम ठरली आहे.

प्रशिक्षणात शिक्षकांना सुविधा देता येत नसतील तर दोन हजार रुपये नोंदणी शुल्क कशाचे घेतले, असा सवाल प्रशिक्षणार्थी शिक्षकांकडून उपस्थित होत आहे. तालुक्यांचे प्रशिक्षण तालुक्यात ठेवून प्रशिक्षणार्थ्यांना भोजनासह दैनंदिन उपस्थिती भत्ताही नसल्याने प्रशिक्षणार्थी शिक्षकांना मानसिक, शारीरिक व आर्थिक त्रास राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांच्याकडून देण्यात येत या संदर्भात अनेक शिक्षकांनी नाराजी व्यक्त करुन.शिक्षकानी व्यवस्थापनावर संताप व्यक्त केला दि. २ जून ते १२ जून या दहा दिवसात प्रशिक्षणार्थ्यांना ऑनलाइन व ऑफलाइन प्रशिक्षण देण्यात येणार आहे. पण प्रशिक्षणाच्या पहिल्याच दिवशी ऑनलाइन चाचणी घेणारी लिंकच ओपन होत नसल्याने प्रशिक्षणाचा पहिल्या दिवशीच फज्जा उडाल्याचे अनेक शिक्षकानी सांगीतले. ऑनलाइन लिंक ओपन होत नसल्याने सर्व प्रशिक्षणार्थ्यांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.

या संदर्भात प्रशिक्षण प्रमुखांना सुविधेबदल विचारणा केली तर त्यांनी कोणतीच अडचण नाही असे सांगीतले पण सध्या पावसाळ्याचे दिवस असताना फिल्टर पाण्याची सोय नसल्याने प्रशिक्षण स्थळावरील विंधन बोअरचे पाणी पिण्यास दिले जाते असे सांगितले.प्रशिणार्थी संख्या लक्ष्यात घेता तीन प्रशिक्षण रुम प्रस्तावित असताना बालवाडीच्या लाहान मुलांना एकाच रुम मध्ये कोंबुन एकाच ठिकाणी वर्ग घेतला जातात तशे प्रशिक्षणार्थींना बसवले जाते अनेक महिला व पुरुष प्रशिक्षणार्थ्यांना आजार आसल्यचे सांगीतले पण या ठिकाणी कोणतीच सुविधा नाहित प्रशिक्षणार्थी येताना एकच पाणी बाटली घेऊन येतात नंतर पाणी संपले कि फिल्टर बाटली घेऊन येण्यासाठी शिवाजी चौकात येतात तोपर्यंत प्रशिक्षण वर्ग संपतो अशा गैरसोय व्यवस्थेमुळे अनेक प्रशिक्षणार्थींनी नाराजी व्यक्त केली.

# नांदेडात ईद उत्साहात साजरी

**तभा वृतसेवा**
**नांदेड , दि.०९ जून -**

पवित्र ईद-उल-अजहा (बकरी ईद) नांदेड शहरात उत्साह, शांतता आणि धार्मिक वातावरणात मोठ्या भक्तिभावाने साजरी करण्यात आली.ईदची नमाज सकाळी ठीक ८ वाजता पाकीजा नगर, देगलूर नाका येथील ईदगाह मैदानावर शांततेच्या वातावरणात अदा करण्यात आली. हजारो मुस्लीम बांधवांनी एकत्र येत नमाज अदा केली.

# पत्रकार दिलीप वाघमारे यांचा सत्कार

**तभा वृतसेवा**
**नरसी , दि.०९ जून -**

नांदेड जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या नुतन जिल्हा संघटकपदी नरसी येथील पत्रकार दिलीप वाघमारे यांची निवड झाल्याबद्दल व नांदेड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे माजी संघटक पंडीतराव वाघमारे यांचा कार्यकाळ संपल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते भास्कर पाटील भिलवंडे यांनी राज पॅलेस येथे यथोचित सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यावेळी नांदेड जिल्ह्य मराठी पत्रकार संघाचे माजी जिल्हाध्यक्ष तथा जेष्ट पत्रकार सुर्यकांत सोनखेडकर, संपादक रघुनाथ सोनकांबळे, माजी जिल्हा संघटक पंडित वाघमारे, डिजिटल मिडीया परीषदेचे तालुकाध्यक्ष गंगाधर गंगासागरे , मराठी पत्रकार संघाचे तालुका उपाध्यक्ष गोविंदराव नरसीकर, माधव कोरे,श्याम पाटील चोंडे, बंटी डुमणे,साईनाथ बावणे आदींची उपस्थिती होती.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक उभारणार: आ. चिखलीकर

**तभा वृतसेवा**
**लोहा , दि.०९ जून -**

शहरात गेल्या अनेक वर्षापासून अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक उभारण्याची मागणी समाज बांधवांची आहे त्या अनुषंगाने येत्या काळात सर्व समाजाला सोबत घेऊन पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांचे शहरात भव्य स्मारक उभारण्यात येईल अशी ग्वाही आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी दिली आहे.

अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी करण्यात आली . बैल बाजार मैदानात बिरोबा मंदिरात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते करण्यात आले. उपस्थितीताना मार्गदर्शन करताना आ चिखलीकर यांनी शहरात अहल्यादेवी होळकर याचे भव्य स्मारक उभे करण्याचे सांगितलेफ जयंती मंडळाच्या वतीने आ.



प्रतापराव पाटील चिखलीकर त्यांचा सत्कार करण्यात आला

माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम, ,राम सावकार,सूर्यवंशी , माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले, माजी जिल्हा परिषद सदस्य भगवानराव हाके, हळदवचे सरपंच प्रल्हाद वडजे ,हरिभाऊ चव्हाण, मंगेश क्षिरसागर,जयंती मंडळचे अध्यक्ष पिराजी धुळगंडे, उपाध्यक्ष गजानन गुंठे,माळेगाव सरपंच हणमंत धुळगंडे,गिराज सुरनर,शंकर गुंठे ,दशरथ गुंठे, व्यंकट जंगले,मारोती जंगले,माधव डोईफोडे, किरण डोईफोडे ,केशव खांडेकर यांच्यासह समाज बांधव उपस्थित होते.

# विद्यापीठ मुख्य प्रवेशद्वार कमानीचा विद्यापीठ प्रशासनाला पडला विसर



**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि.०९ जून -**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ प्रवेशद्वार कमानीचे काम गेल्या चार ते पाच वर्षापासून चालू असून ते आज पर्यंत पूर्ण झालेले नाही. सदरील प्रवेशद्वार कमानीच्या कामाबाबत विद्यापीठ प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे का? डॉ. मनोहर चासकर यांच्यासह इतर अधिकारी यांना दौऱ्यांच्या अडथळ्यामुळे विद्यापीठ कमानीसह प्रशासकीय कामकाजात विसर पडल्याने बरेचसे काम रेंगाळत असल्याचे दिसून येते.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ विष्णुपुरी नांदेड येथील विद्यापीठ मुख्य प्रवेशद्वार कमान ही महामार्गास अडथळा आल्यामुळे ती पाडण्यात आली होती. पण आता तो महामार्ग पूर्ण व सुरळीत झाला असून तरीसुद्धा विद्यापीठ मुख्य प्रवेशद्वार कमान मात्र अद्याप पूर्ण झालेली नाही. याला विद्यापीठ प्रशासन जबाबदार आहे. येथील अधिकाऱ्यांचे विद्यापीठातील कामकाजावर लक्ष नसून बाहेरील दौऱ्यास जास्त प्राधान्य दिले असल्याने विद्यापीठातील बरेच कामे अपूर्ण असल्याचे दिसून येते.ती कामे वेळेवर पूर्ण होण्यासाठी याकडे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर , प्र कुलगुरू व कुलसचिव यांचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते. आसे अनेक प्रश्न विद्यापीठ कमानीचेच नसून प्रशासकीय कामकाजात प्रत्येक विभागातील कामे वेळेवर होत नाहीत. त्याचे कारण म्हणजे काम करणारे कर्मचारी यांनाच जास्त काम दिले जाते. तर काही कर्मचारी आपले टेबल सोडून आपली खाजगी कामे करत असतात.व वेळेवर येऊन थम करतात व वेळेच्या नंतर एक ते अर्धा तासाने येऊन थम करतात कारण अधिकाऱ्यांना वाटले पाहिजे की हा कर्मचारी जास्त वेळ कर्तव्यावर राहून अधिकचे काम करतो. पण असे कर्मचारी कामाची टाळाटाळ करून आपले दिवस पूर्ण करतात.याकडे अधिकाऱ्यांनी वेळोवेळी लक्ष घातले पाहिजे असे विद्यापीठातील काही कर्मचाऱ्यात चर्चा ऐकावयास मिळते. म्हणून सध्या तरी विद्यापीठात कुठल्याही कामाची शिस्त नसल्याचे दिसून येते व मुख्य अधिकारी दौऱ्यावरच व्यस्त असल्याने बाकी अधिकारी व कर्मचारी यांचे कामावर लक्ष नसून येथील कामे वेळेवर पूर्ण होत नाहीत. चार ते पाच वर्षापासून विद्यापीठाचे नाक समजल्या जाणारी मुख्य प्रवेशद्वार कमान

ही ओसाड पडली आहे. त्याकडे जबाबदार अधिकारी यांचे दुर्लक्ष झाले आहे. तरी सदरील कामकाजाकडे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर हे लक्ष घालून लवकरात लवकर मुख्य प्रवेशद्वार कमानीचे काम पूर्ण करून विद्यापीठ पूर्व रंगा रूपास येईल असे सर्वांना अपेक्षित आहे.

# आवास प्लस ऍपवर नोंदणी करण्यासाठी १८ जूनपर्यंत मुदतवाढ

### मनसे जिल्हाध्यक्ष राठोड यांच्या मागणीची शासनाकडून दखल


**तभा वृतसेवा**
**माहुर, दि.०९ जून -**

आवास प्लस ऍपच्या तांत्रिक अडचणीमुळे माहूर तालुक्यासह जिल्ह्यातील अनेक घरकुल लाभार्थ्यांना नोंदणी करण्यासाठी शासनाने ठरवून दिलेल्या ३१/०५/२०२५ या शेवटच्या तारखेपर्यंत नोंदणी करता आली नसल्याने आवास प्लस ऍपच्या माध्यमातून नोंदणीसाठी मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष रवी राठोड यांनी जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कडे निवेदनाद्वारे केली होती. तर या जनहितार्थ मागणीचे वृत्त अनेक वृत्तपत्रांनी अग्रक्रमाने प्रकाशित करुन शासनाचे लक्ष याबाबत वेधल्याने अखेर दि.०४ जून रोजी केंद्र सरकारने महाराष्ट्र सरकारला आवास प्लस ऍपच्या माध्यमातून घरकुल नोंदणीसाठी १८ जून २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यासाठी आदेशीत केले आहे.

आवास + मोबाईल ऍप्लिकेशन हे प्रधानमंत्री आवास योजना (PMY) - ग्रामीणची अंमलबजावणी सुलभ करण्यासाठी सरकारच्या डिजिटल उपक्रमाचा एक भाग असून, हे ऍप

स्व-सर्वेक्षण वापरून झचध-ऋ योजनेसाठी पात्र लाभार्थ्यांची कार्यक्षम ओळख आणि व्यवस्थापन करण्यास मदत करते. परंतु,नोंदणी करताना घरकुल लाभार्थ्यांना सदरील ऍपवर नोंदणी करताना तांत्रिक अडचणीचा सामना करावा लागत असल्याने शासनाने ठरवून दिलेल्या ३१ मे या शेवटच्या तारखेपर्यंत तालुक्यासह जिल्ह्यातील अनेक पात्र घरकुल लाभार्थ्यांना नोंदणी करता आली नाही. परिणामी त्यांना आपल्या हक्काच्या घरकुलापासून मुकण्याची गंभीर वेळ आली. या गोष्टीची जाणीव झाल्यावर मनसेचे जिल्हाध्यक्ष रवी राठोड यांनी दि.३० मे रोजी एका निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना याबाबत अवगत करून देत आवास प्लस ऍपवर नोंदणी करण्यासाठी मुदतवाढ देण्याची मागणी केली होती.

आवास प्लस सर्वेक्षण ऍप हे एक डिजिटल प्लॅटफॉर्म असून,ज्याद्वारे सरकार पंतप्रधान आवास योजनेच्या लाभार्थ्यांचे सर्वेक्षण करते आणि पात्र कुटुंबे या ऍपचा वापर करून पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत विविध ऑनलाइन सेवांचा लाभ घेऊ शकतात जसे की अर्ज करणे किंवा त्यांचे नाव तपासणे इ. सदरील ऍप ग्रामीण भागातील विकासासाठी ग्रामीण विकास मंत्रालयाने सुरू केले आहे.ग्रामीण भागातील घरकुल योजनेअंतर्गतलाभार्थ्यांसाठी सर्वेक्षण आणि अर्ज प्रक्रिया डिजिटल माध्यमातून अगदी सोपी करण्याचा हा या ऍप मागील एक मोठा उद्देश आहे.



ज्यांना राहायला पक्के घर नाही व जे आर्थिक दृष्ट्या दुर्बल आहेत,त्यांनी थड झडग्ण डणठतएध झझ वापरून आपल्या घराचे सर्वेक्षण केले, तर सर्वेक्षणानंतर काही कालावधीत सरकारकडून दिलेली आर्थिक मदत थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये जमा केली जाते. आता आवास प्लस ऍपवर नोंदणी करण्यासाठी शासनाने १८ जूनपर्यंत मुदतवाढ दिल्याने घरकुल योजनेअंतर्गत नोंदणी करण्यासाठी राहिलेल्या सर्व पात्र लाभार्थ्यांनी आपली घरकुल मागणीची नोंदणी करुन घ्यावी , असे आवाहन मनसेचे जिल्हाध्यक्ष रवी राठोड यांनी केले आहे. आवास प्लस ऍपवर नोंदणी करण्यासाठी मुदतवाढ करुन द्यावी यासाठी शासनाकडे जोरकसपणे मागणी लावून धरत सातत्याने पाठपुरावा करून मुदतवाढ देण्यासाठी भाग पाडल्याबद्दल मनसे जिल्हाध्यक्ष रवी राठोड यांचे वंचित पात्र घरकुल लाभार्थ्यांनी अभिनंदन करत आभार व्यक्त केले आहे.

# नरसी शहरात बकरी ईद उत्साहात साजरी

**तभा वृतसेवा**
**नरसी , दि.०९ जून -**

नरसी येथे सकल मुस्लिम समुदायाच्या वतीने रविवारी सकाळी सात वाजता मुस्लिम धर्मातील परंपरेनुसार मुस्लिम बांधवांनी एकत्र येवून येथील ईदगाह मैदानावर नमाज पठण केले. तद्नंतर गावा तील राजकीय क्षेत्रातील पुढारी प्रति ष्ठित नागरिकांनी येथील ईदगाह मैदानावर नमाज पठण करण्यासाठी आलेल्या सर्व मुस्लिम बांधवांनी आलिंगन देत बकरी ईद च्या शूभेच्छा दिल्या.

दि. ७.रोज शनिवारी सकाळी ठिक सात वाजता सकल मुस्लिम बांधवांनी एकत्र येत येथील नरसी मुखेड रोड वरील ईदगाह मैदानावर मुस्लिम धर्मातील परंपरेनुसार नमाज पठण करीत.राज्यात यंदाच्या वर्षांमध्ये पाऊस समाधान कारक होवू दे अन्नधान्याची भर भराटी होवू दे राज्यातीला सर्व धर्मातील सामान्य नागरिक ,शेतकरी बांधवात सुख शांती व समाधानाचे वातावरण नांदू दे अशी अल्लाहकडे (ईश्वराकडे)आर्त हाक देत यावेळी प्रार्थना केली.नमाज पठण झाल्यानंतर रामतीर्थ ठाण्याचे ठाणेदार साह्यक पोलीस निरीक्षक श्रीधर भागवत जगताप नरसी बिटचे जमादार चंद्रमणी सोनकांबळे व पोलीस जवानांसह, सरपंच गजानन भिलवंडे भाजपाचे श्रावण भिलवंडे व गावातील अन्य प्रतिष्ठित मंडळींनीही ईदगाह बाहेर थांबुन ईदगाहातून बाहेर येणाऱ्या सकल मुस्लिम बांधवांशी मनोमिलन करीत यावेळी बकरी ईदच्या शुभेच्छा दिल्या.

या मुस्लिम धर्मातील पवित्र सणाच्या वेळी कुठला अनुचित प्रकार घडू नये यासाठी रामतिर्थ ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक श्रीधर भागवत जगताप हे जातीने उपस्थित राहुन चोख असा बंदोबस्त ठेवला होता.

धाराशिव
# दिनांक
सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## जि.प.कडून गुरुवारी पत्रकारांची आरोग्य तपासणी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ जून -**
जिल्हा परिषद,धाराशिवच्या वतीने जिल्ह्यातील सर्व पत्रकारांसाठी एकदिवसीय आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.विविध उपक्रम तसेच शासकीय योजनांबाबत मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन दि.१२ जून रोजी स्थायी समिती सभागृह, जिल्हा परिषद, धाराशिव येथे करण्यात आले आहे. या कार्यक्रमाची रूपरेषा पुढीलप्रमाणे आहे,सकाळी १० वाजता पत्रकारांची नाव नोंदणी होईल. त्यानंतर १०.३० वाजता प्रास्ताविक सत्र होईल. सकाळी ११ ते दुपारी १ वाजेपर्यंत आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.डॉ.राठोड व डॉ. रवी चव्हाण हे पत्रकारांची आरोग्य तपासणी करतील. दुपारी १ ते २ या वेळेत जिल्हा परिषदेच्या विविध विभाग प्रमुखांकडून विविध शासकीय योजना व उपक्रमांची माहिती देणार आहे.त्यानंतर २ ते २.३० या वेळेत अल्पोहार व समारोप सत्र होईल. या आरोग्य तपासणी शिबीर व कार्यशाळेस जिल्ह्यातील सर्व पत्रकारांनी उपस्थित राहावे,असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष यांनी केले आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### शेतकऱ्यांना भरपाई द्या; शिवसेनेची (म) मागणी

**परंडा, दि.९ जून -**
मे महिन्यात झालेल्या मान्सून पूर्व अतिवृष्टीमुळे तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. कर्ज घेऊन जोपासलेली पिके वाया गेल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडलेला आहे. तालुक्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तात्काळ आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी शिवसेना मागासवर्गीय विभाग परांडा तालुका यांच्यावतीने पंचायत समितीचे माजी सदस्य गुलाब शिंदे यांच्या नेतृत्वाखाली दि.९ जुन सोमवार रोजी परंडा तहसिलदार यांच्याकडे निवेदनाव्दारे सरसकट नुकसान भरपाई शेतक्यांना मिळावी अशी मागणी केली आहे. यावेळी शिवसेना मागासवर्गीय विभागाचे पदाधिकारी राजेश्री चव्हाण, किशोर हावळे, श्रीराम शेंडगे, उत्तरेश्वर जाधव, बालाजी शेंडगे, हनुमंत शेंडगे, महेश कोळेकर, भिमराव भोसले, जगन्नाथ गुटाळ, राहुल दोलतोड, चंद्रकांत अवाने, लखन दनाने, गणेश शेलार, दिपाली शिंदे, शिवाजी शिंदे, दिनकर जाधव उपस्थित होते.

### ॲड. जयंत इंगळे यांचा सन्मान

**इटकळ, दि.९ जून -**
सर्व सामान्यांना न्याय मिळवून देणारे ॲड.जयंत इंगळे यांचा इटकळ ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने सन्मान करण्यात आला. तुळजापुर कोर्ट येथील ॲड.जयंत इंगळे यांचा इटकळ येथे ग्रामीण पत्रकार संघाच्या



वतीने फेटा शाल व पेन देऊन सत्कार करण्यात आला. त्यांनी आपल्या वकिली व्यवसायात अनेक गरीब सर्व सामान्यांना नागरिकांना न्याय मिळवून दिला आपण समाजाचे काही तरी देणे आहोत हा भाव ठेऊन ते सर्वांशी अगदी प्रामाणिकपणे संवाद साधून जे सत्य आहे त्यासाठीच ते नेहमी प्रयत्नशील असतात म्हणूनच त्यांना आणखी ऊर्जा मिळावी प्रोत्साहन मिळावं यासाठी इटकळ ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने सन्मान करून शुभेच्छा दिल्या. यावेळी हभप.अशोकराव जाधव गुरूजी बाभळगाव, इटकळ ग्रामीण पत्रकार संघाचे अध्यक्ष दिनेश सलगरे, केशव गायकवाड, नामदेव गायकवाड, शिव हाद्रे, अफसर शेख आदी उपस्थित होते.

## पवनचक्की कंपन्यांकडून शेतकऱ्यांना होणारा त्रास खपवून घेणार नाही

**मा.आमदार सुजितसिंह ठाकूर यांनी दिल्या अधिकाऱ्यांना सूचना... २९ वर्षाच्या भाडेपट्ट्यावर दलालामार्फत शेतकऱ्यांच्या घेतल्या जातात जमिनी...**

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.९ जून -**
दुष्काळी भाग म्हणून ओळख असलेल्या वाशी तालुक्यात विविध पवन ऊर्जा निर्मिती करणाऱ्या प्रकल्पाकडून पवनचक्की उभारण्याची कामे सुरू आहेत. पवनचक्की उभा करताना पाच ते सहा एकर शेतकऱ्याची जमीन २९ वर्षाच्या भाडेपट्ट्यावर घेतल्या जातात. पवनचक्कीच्या अधिकाऱ्यांनी ठेवलेल्या दलालामार्फत शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्या जात आहेत. पवनचक्कीने नियुक्त केलेले दलाल हे पर जिल्ह्यातील असल्याचे सांगितले जाते.



पवनचक्कीच्या एका पॉईंटला शेतकऱ्यांना खरा किती दर दिला जातो? याबाबत शेतकऱ्याच्या मनामध्ये शंका निर्माण झाली आहे. त्यामुळे तालुक्यातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांमध्ये गोंधळ उडाला आहे. याबाबत शेतकऱ्यांनी पवनचक्कीच्या अधिकाऱ्यांना विचारणा केली,असता पवनचक्कीकडून शेतकऱ्याला दमदाटी करत गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली जात आहे. यामुळे शेतकर्यांना भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आमची शेती असताना आम्ही चोर झालो आणि पवनचक्की अधिकारी हे आमच्या जमिनीचे मालक झाले,असे शेतकरी सांगत आहेत. तर अनेक ठिकाणी पवनचक्कीकडून पोलीस बलाचा वापर करत पवनचक्की उभारण्याची कामे सुरू आहेत. नागरिकांनी शेतकऱ्यांनी पवनचक्कीच्या विरोधात वेळोवेळी तक्रारी दिल्या मात्र प्रशासनाकडून कसलीही दखल घेतली जात नाही. त्यामुळे प्रशासनातील अधिकाऱ्यावर शेतकऱ्यांनी, नागरिकांनी शेंखा व्यक्त केली.

पवनचक्की कडून सुरू असलेल्या अन्यायाबाबत तालुक्यातील काही शेतकऱ्यांनी भाजपचे जेष्ठ नेते माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांची भेट घेऊन तालुक्यातील प्रकाराची माहिती दिली. यावेळी ठाकूर यांनी तालुक्याचे तहसीलदार प्रकाश मेहत्रे तसेच वाशी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस अधिकारी संग्राम थोरात यांना फोन करून शेतकऱ्यावर सुरू असलेला अन्याय सहन केला जाणार नाही, अश्या सूचना अधिकाऱ्यांना त्यांनी दिल्या. ठाकूर तेरखेडा दौऱ्यावर आले असता शेतकऱ्यांनी त्यांच्याकडे तक्रारी केल्या होत्या.

यावेळी प्रसारमाध्यमांना बोलताना सुजिसिंह ठाकूर यांनी सांगितले की शेतकरी हा आपल्या देशाचा कणा आहे. तो रोज पहाटेपासून सायंकाळपर्यंत शेतात घाम गाळतो, ऊन, पाऊस, थंडी यांची पर्वा न करता तो अन्नधान्याची निर्मिती करतो. तेव्हाच आपल्याला पोटभर अन्न मिळते आणि त्याला कोणी धमकी वगैरे व त्याच्या केसालाही धक्का लावण्याचा प्रयत्न केला तर त्याची गई केली जाणार नाही, असे बोलताना सांगितले.



## शिवसेनेचे शहरप्रमुख सनी पवार भाजपमध्ये; असंख्य कार्यकर्त्यांसह जाहीर प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ जून -**
शिवसेनेचे धाराशिव शहरप्रमुख सनी पवार यांनी असंख्य कार्यकर्त्यांसह आ.राणाजगजितसिंह पाटील यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला.

या प्रवेशप्रसंगी सनी पवार यांच्यासह त्यांच्या सोबत असलेले शिवसेना कार्यकर्ते प्रकाश पवार, सतीश पवार, रत्नदीप पवार, राहुल सुरवसे, आकाश खोत, आकाश जगताप, राजेश म्हेत्रे, संदीप पवार, संतोष गाडे, प्रेम काळे, बाजीराव शिंदे, प्रशांत वाघमारे, ऋषी विरकर, सुनील काळे, विजय भगत, अजय भगत, अश्रुबा वारे, अर्जुन पवार, आशिष सुरवसे, विशाल गोरे आणि अक्षय शिंदे आदींचा भाजपमध्ये प्रवेश झाला.

कार्यक्रमावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी, प्रमुख पदाधिकारी, ज्येष्ठ नेते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एजंटकडून २६ हजारांची फसवणूक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ जून -**
श्रीराम लाईफ इन्शुरन्स कंपनीच्या शाखेतील एका कर्मचाऱ्याने ग्राहकाची विश्वासघातकीपणे २६ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी किरण पाचपोर (रा. नंदनवन, नागपूर, सध्या रा. श्रीराम लाईफ इन्शुरन्स, शाखा धाराशिव) याने दि. ८ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी १.३० वाजता समर्थनगर येथील निर्मला बस्वेश्वर नगरे (वय ४८) यांच्याकडून इन्शुरन्स पॉलिसीचा हप्ता भरण्याच्या नावाखाली एकूण ४५,००० रुपये घेतले.

त्यावेळी आरोपीने कंपनीचे सर्व्हर डाउन असल्याचे कारण देत, फक्त कच्च्या पावतीवर रक्कम घेतली आणि विश्वासात घेऊन सही करून दिली. परंतु काही दिवसांनी विचारणा केली असता, आरोपीने त्यातील फक्त १९,००० रुपये परत केले आणि उर्वरित २६,००० रुपये परत न करता फसवणूक केली.

या प्रकरणी फिर्यादी निर्मला नगरे यांनी ८ जून २०२५ रोजी आनंदनगर पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर भादंवि कलम ३१६(५), ३१८(४) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## कांदाचाळीसाठी शेतकऱ्यांनी अनुदानाचा लाभ घ्यावा; कृषि विभागाचे यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ जून -**
राज्यात कांदा उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असले तरी त्याच्या साठवणुकीअभावी शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते.त्यामुळे कांद्याची सड, वजन घट व गुणवत्तेत बिघाड होतो. हे लक्षात घेता एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत सन २०२५-२६ मध्ये कमी खर्चाचे कांदाचाळ / लसूण साठवणूक गृह या घटकाचे प्रकल्प राबवण्यात येणार आहेत.

या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना ५ ते १ हजार मे.टन क्षमतेच्या साठवणूक गृह उभारणीसाठी शास्त्रशुद्ध सुविधा उपलब्ध करून



देण्यात येणार असून, प्रकल्प खर्च ३० लक्ष रुपयांपेक्षा जास्त असल्यास बँक कर्ज आवश्यक राहील.या योजनेत 'क्रेडिट लिंक्ड बँक एंडेड सबसिडी' स्वरुपात अनुदान देण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत खर्च मर्यादा ७,००० रुपये प्रति मे.टन असून, अनुदानाची रचना क्षमतेनुसार खालीलप्रमाणे आहे : ५-२५ मे.टन-१० हजार रुपये प्रति मे.टन (५०% अनुदान).२५-५०० मे.टन-८ हजार रुपये प्रति मे.टन, ५००-१००० मे.टन -६ हजार रुपये प्रति मे.टन. या योजनेचा लाभ वैयक्तिक कांदा उत्पादक शेतकरी, शेतकऱ्यांचे गट, स्वयंसहायता गट, महिला गट, एफपीओ, नोंदणीकृत शेती संस्था व सहकारी संस्था घेऊ शकतात.

लाभार्थी पात्रता निकष : अर्जदाराकडे स्वतःच्या मालकीची जमीन असावी व ७/१२ उताऱ्यावर कांदा पिकाची नोंद असावी.अर्ज करताना शेतकऱ्याकडे प्रत्यक्ष कांदा पीक असणे बंधनकारक आहे. कांदा साठवणुकीसाठी आधुनिक पद्धतीने उभारण्यात आलेल्या चाळीमुळे उत्पादनाची गुणवत्ता टिकून राहते आणि शेतकऱ्यांना अधिक नफा मिळतो. त्यामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा,असे आवाहन करण्यात आले आहे. या योजनेसाठी महाडीबीटी पोर्टलवर https://mahadbt.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर 'फलोत्पादन' या घटकाखाली अर्ज करावा. अधिक माहितीसाठी संबंधित कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी रविंद्र माने यांनी कळविले आहे.

## कळंब स्थानकातील पाणपोईचे लोकार्पण

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.९ जून -**
येथील बस स्थानकात कळंब शहरातील प्रतिष्ठित व्यापारी स्वर्गीय कैलास जी अग्रवाल यांच्या स्मरणार्थ त्यांच्या परिवाराकडून स्वखर्चाने उभारलेल्या अत्याधुनिक पाणपोईचा लोकार्पण सोहळा कळंब धाराशिव विधानसभा मतदारसंघाचे आमदार कैलास पाटील यांच्या हस्ते दि. ८ जून रविवार रोजी करण्यात आला.



कळंब बस स्थानकात स्वखर्चातून उभा करण्यात आलेल्या अत्याधुनिक पाणपोईची व्यवस्था अग्रवाल परिवाराकडून करण्यात आली होती. या पाणपोईचा खर्च जवळपास सहा लाख रुपये खर्च करून उभारण्यात आलेल्या प्रवाशांच्या आरोग्यवर्धक स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करून पाणपोईच्या माध्यमातून लोकार्पण सोहळा नुकताच आमदार कैलास पाटील यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला.

याप्रसंगी अग्रवाल परिवारातर्फे रेखाताई अग्रवाल, कल्पेश अग्रवाल, कार्तिक अग्रवाल, कविता अग्रवाल, योगेश अग्रवाल, विभागीय वाहतूक अधिकारी अभय देशमुख कार्यक्रमाचे अध्यक्ष कळंबचे आगार प्रमुख एस.डी.खताळ त्याचप्रमाणे दिलीप पाटील, मोहन जाधव, प्रदीप मेटे, प्रभाकर झांबरे, दत्ता मुंडे, वाहतूक नियंत्रक हनुमंत मुंडे, करसं पटेल, संजय देवडा, अमोल वाघचौरे, शिवाजी निळे, विष्णू कोल्हे, राजाभाऊ देशमाने, डॉ.श्याम चौधरी, ठेकेदार टेकाळे यांच्यासह आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन ज्योतीराम तर व प्रभाकर झांबरे यांनी केले तर कार्यक्रम पार पाडण्यासाठी कळंब बस स्थानकातील राज्य परिवहन महामंडळाचे कर्मचारी व अधिकारी यांनी परिश्रम घेतले.

## वसतिगृह प्रवेश प्रक्रिया ११ जूनपासून ऑनलाईन : गुणवत्तेनुसार मिळणार प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ जून -**
मागासवर्गीय मुला-मुलींसाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून शासकीय वसतिगृहे ही योजना राबविण्यात येते.या योजनेंतर्गत जिल्ह्यात एकूण ११ शासकीय वसतिगृहे कार्यरत आहेत. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी वसतिगृह प्रवेश प्रक्रिया दिनांक ११ जून २०२५ पासून ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येणार असल्याची माहिती सहाय्यक आयुक्त सचिन कवले यांनी दिली आहे.

या प्रवेश प्रक्रियेअंतर्गत शालेय, कनिष्ठ महाविद्यालय,व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमास अर्ज स्वीकारले जातील.शासकीय वसतिगृहांमध्ये विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जाईल. जे विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश मिळवू शकत नाहीत,त्यांच्यासाठी 'स्वाधार' ही योजना उपलब्ध आहे.मात्र, 'स्वाधार' योजनेसाठीही वसतिगृह प्रवेशाकरिता ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.

अर्ज https://hmas.mahait.org या अधिकृत वेबसाईटवर ऑनलाईन पद्धतीने भरावयाचा आहे. त्यामुळे इच्छुक मागासवर्गीय विद्यार्थी व विद्यार्थीनींनी विहित मुदतीत अर्ज भरून प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन सचिन कवले, सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण, धाराशिव यांनी केले आहे.

## शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिवराज्याभिषेक दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.९ जून -**
शिवराज्याभिषेक दिनानिमित्त लोहारा शहरातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात दि.६ जून २०२५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रातील ४४० शासकीय व निमशासकीय ५०० औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात छत्रपती शिवरायांचा शिवराज्याभिषेक दिनाचे ऑनलाइन पद्धतीने उद्घाटन केले. त्यानंतर लोहारा शहरातील औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.




कार्यक्रमासाठी उपस्थित औद्योगिक प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य एस.बी.कांबळे प्रमुख वक्ते प्रा.यशवंत चंदनशिवे, प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते शंकरराव जाधव, सरपंच अभिमान कांबळे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन आणि छत्रपती शिवरायांचे प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

प्रा.चंदनशिवे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले, आगामी काळात देशात समाज जागरण करण्याचा पायाभूत कार्यक्रम राष्ट्र संस्कृती आणि परंपरा या आधारभूत पाया तरुणांमध्ये रुजवण्याचे कार्य महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून केले जात आहे. पर्यावरण संतुलन कुटुंब नियोजन नागरिकांचे कर्तव्य स्वदेशी विचाराचा जागर या पंचसूत्रीच्या माध्यमातून राष्ट्र उभारणे करण्याचे उद्दिष्ट महाराष्ट्र शासनाने समाजापुढे ठेवले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याभिषेकाचे अवचित देशातून १६ व्या शतकात स्वदेशी विचाराची मुहूर्तमेढ रोवली होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य कांबळे यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.पुजारी यांनी केले आणि या कार्यक्रमाचे आभार प्रा.ए.बी.भोसले यांनी केले. शिवराज्याभिषेक दिन मोठ्या उत्साहात साजरा झाला.

यावेळी एन.एच.कांबळे, व्ही. व्ही.बालकुंदे, के.के.पांचाळ, के. डी.यादव आणि शिक्षकोत्तर कर्मचारी यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पवन ऊर्जा प्रकल्पांतील तार चोरीचा सुळसुळाट

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ जून -**
जिल्ह्यात उभारले जात असलेले पवन ऊर्जा प्रकल्प सध्या तार चोरीच्या समस्येमुळे अडथळ्यात सापडले आहेत. तुळजापूर, उमरगा, लोहारा, वाशी, कळंब आणि



नळदुर्ग परिसरात विद्युत वाहिन्यांच्या तारा आणि पोलवरील वायर चोरीचे प्रमाण झपाट्याने वाढले असून, ही बाब अत्यंत चिंताजनक बनली आहे. हे प्रकार काही हजार रुपयांचे नसून कोटींच्या घरात पोहोचले आहेत, त्यामुळे या चोरीच्या मागे मोठं रॅकेट असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. प्रकल्प उभारणाऱ्या कंपन्यांनी वारंवार पोलिसांकडे तक्रारी करूनही ठोस कारवाई झालेली नाही.

नळदुर्ग पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या किलज व सलगरा परिसरात विशेषतः हे प्रकार जास्त घडत आहेत. प्रकल्पस्थळी दिवसा काम सुरू असताना रात्री पुन्हा नव्याने चोरी होणे ही गंभीर बाब असून, पोलिसांच्या गस्ती व्यवस्था आणि गुप्त माहिती यंत्रणेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. प्रकल्प कंपन्यांचे अधिकारी पोलिसांच्या दुर्लक्षामुळे हतबल झाले असून, त्यांनी स्पष्टपणे सांगितले की चोरी झाल्यानंतरही पोलीस योग्य तपास करत नाहीत.

चोरी झालेल्या भागात दुसऱ्या दिवशी काम करूनसुद्धा रात्री पुन्हा तारे चोरी जात आहेत. यामुळे अधिकारी वैतागले असून, प्रकल्प वेळेत पूर्ण होणार की नाही याबाबत शंका निर्माण झाली आहे. या चोऱ्यांमुळे केवळ आर्थिक नुकसान होत नसून, ऊर्जा निर्मिती प्रकल्प विलंबित होण्याचा धोका वाढला आहे. त्यामुळे यामागील सूत्रधार, म्हणजेच 'अक्का' कोण आहे, हे शोधणे पोलिसांसाठी अत्यावश्यक बनले आहे.

जुने पोलिस अधीक्षक संजय जाधव यांच्या कार्यकाळात देखील या चोरीला आळा बसलेला नव्हता, त्यामुळे नवनियुक्त पोलिस अधीक्षक रितू खोकर यांच्यासमोर हे एक मोठे आव्हान ठरणार आहे. सध्या संपूर्ण जिल्ह्यात अशा प्रकारच्या चोरीचे प्रमाण झपाट्याने वाढले असून, यावर पोलीस प्रशासनाने वेळ न घालवता धडक कारवाई हाती घ्यावी, अशी मागणी सर्व स्तरांतून होत आहे.

जिल्ह्यातील पवन आणि सोलर प्रकल्पांमधील या चोऱ्यांमुळे शासनाच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांवरच गालबोट लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. प्रकल्प कंपन्यांच्या म्हणण्यानुसार, पोलीस यंत्रणा यावर गंभीरपणे विचार करत नसल्याचे चित्र आहे. पोलिसांच्या निष्क्रीयतेमुळे चोरट्यांचे मनोबल वाढले आहे. यामुळेच 'या चोऱ्यांच्या मागे कोण आहे? त्यांना संरक्षण मिळते का?' यावरही अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.

जिल्ह्यातील नागरिक, प्रकल्प कंपनीचे अधिकारी तसेच स्थानिक प्रशासनाची अपेक्षा आहे की, रितू खोकर यांच्या कार्यकाळात या चोऱ्यांना आळा बसेल. पोलिसांनी यासाठी स्वतंत्र तपास पथक, गुप्तचर व्यवस्था, सतत गस्त आणि टेक्नॉलॉजीचा वापर करून या प्रकरणात दखल घ्यावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

तार चोरीचे प्रकार जितके गंभीर आहेत, तितकेच प्रशासनाचे अपयशही ठळक झाले आहे. त्यामुळे आता वेळ आली आहे की पोलिसांनी ठोस पावले उचलून या रॅकेटमागचा 'अक्का' शोधून काढावा आणि दोषींना कठोर शिक्षा करावी. अन्यथा कोट्यवधींचा सार्वजनिक निधी वाया जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## महाविकास आघाडीच्या आंदोलनास अखेर यश : ऋषिकेश मगर

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.९ जून -**
शहरातील बऱ्याच वर्षापासून प्रलंबित असलेला हुतात्मा स्मारक ते आर्य चौक, किसान चौक हा रस्ता रुंदीकरणाचा मार्ग मोकळा झाला आहे. या रस्त्याच्या रुंदीकरणास मंजुरी दिलेली आहे. या रस्त्याच्या मंजुरीसाठी मागील काही वर्षापासून महाविकास आघाडीच्या माध्यमातून आंदोलने करण्यात आली या आंदोलनाला यश आले आहे, असे काँग्रेसचे युवा नेते ऋषिकेश मगर यांनी सांगितले. रस्ता रुंदीकरणाचा बऱ्याच वर्षापासूनचा प्रलंबित प्रश्न त्या भागातील जेष्ठ नागरिक, व्यापारी यांच्या आंदोलने व महाविकास आघाडीने घेतलेला पुढाकार यामुळे या रस्ता रुंदीकारणास मंजुरी देण्यास भाग पाडले आहे. पालकमंत्री प्रताप सरनाईक, माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांचे महाविकास आघाडीच्या वतीने आभार मानण्यात आले आहेत.

## संक्षिप्त वृत्त...

### मातोश्री पांदण रस्त्याचे काम अपूर्ण, ग्रामस्थांचे उपोषण सुरू



**गंगाखेड/प्रतिनिधी:-** तालुक्यातील खळी येथील मातोश्री पांदण रस्त्याचे काम बोगस पद्धतीने व अपूर्ण अवस्थेत असल्याच्या निषेधार्थ गावकऱ्यांनी पुन्हा एकदा उपोषण सुरू केले आहे. आज दिनांक ६ जून २०२५ रोजी सकाळी उपोषण स्थळी भेट दिली असता ग्रामस्थांनी प्रशासनाच्या दुर्लक्ष व गैरकारभाराबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली.

गावकऱ्यांनी सांगितले की, भारत जागतिक स्तरावर प्रगती करत असताना खेड्यांमधील प्रशासनाची अनास्था व भ्रष्टाचारग्रस्त वृत्तीमुळे शेतकरी आणि ग्रामीण जनतेचे प्रचंड नुकसान होत आहे. एकीकडे महाराष्ट्र सरकार व लोकप्रतिनिधी ग्रामीण व शहरी विकासासाठी प्रयत्नशील असताना दुसरीकडे स्थानिक प्रशासन मात्र ठेकेदारांशी संगनमत करून जनतेला फसवत आहे.

खळी गावातील या रस्त्याचे काम गेल्या दोन महिन्यांपासून अर्धवट सुरू असून, यापूर्वीही मागील महिन्यात ग्रामस्थांनी उपोषण केले होते. त्यावेळी गटविकास अधिकारी, गंगाखेड यांनी रस्ता पूर्ण करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र अद्याप प्रत्यक्षात कोणतेही काम झालेले नाही.

सध्या या रस्त्यावर केवळ खडी टाकून काम थांबवण्यात आले आहे. त्यामुळे बैलगाड्या चालवणे कठीण झाले असून काही शेतकऱ्यांचे बैल जखमी होऊन निकामी झाले आहेत. यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

प्रशासनाने तातडीने लक्ष घालून रस्त्याचे काम पूर्ण करावे, अन्यथा हे आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा गावकऱ्यांनी दिला आहे.

### १४ जूनपर्यंत तापमानात वाढ आणि काही ठिकाणीच मेघ गर्जनेसह पाऊस

#### शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये

**परभणी,/प्रतिनिधी-:** गेल्या जवळपास दोन आठवड्यापासून राज्यातील मान्सूनचा प्रवास पूर्णपणे रखडला आहे, आणि किमान १५ जूनपर्यंत तरी तो रखडलेलाच राहणार आहे. यामुळे १४ जूनपर्यंत पश्चिम किनारपट्टी वगळता राज्यातील विविध भागांमधील तापमानात वाढ होण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा, आणि खानदेशातील कमाल तापमान अधिक राहण्याचा अंदाज आहे. या दरम्यान पूर्व विदर्भात कमाल तापमानात अजून वाढ होऊन ते ४५ अंशापर्यंत जाण्याचा अंदाज आहे, तर विदर्भातील बऱ्याच भागात कमाल तापमान ४० अंशापेक्षा अधिक राहणार असल्याचा अंदाज आहे. मराठवाडा आणि खानदेशातील अनेक भागात कमाल तापमान ४० अंशाच्या आसपास राहण्याचा अंदाज देखील आहे.

१४ जूनपर्यंत राज्यात सार्वत्रिक आणि मान्सूनचा पाऊस अपेक्षित नाही. पाऊस हा प्रामुख्याने दुपार नंतर आणि मेघ गर्जनेसह काही भागातच पडेल, ज्याची शक्यता या आठवड्याच्या सुरुवातीला दक्षिण मराठवाडा आणि दक्षिण मध्य-महाराष्ट्रात अधिक राहील. तुलनेत राज्यातील इतर भागात विखुरलेल्या स्वरूपाचा पाऊस अपेक्षित आहे.

या दरम्यान कमाल तापमान अधिक राहणार असल्यामुळे आणि सार्वत्रिक मान्सूनचा पाऊस अपेक्षित नसल्यामुळे शेतकऱ्यांनी (प्रामुख्याने कोरडवाहू) पेरणी आणि लागवडीची घाई करू नये, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे.

### पूर्णेत शिवराज्यभिषेक सोहळा उत्साहात

**पूर्णा,/प्रतिनिधी-** महाराष्ट्र शासनाकडून शिवराज्याभिषेक सोहळा येथील कृषीभूषण स्व.ॲड . गंगाधर (दादा )पवार शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे शिवराज्याभिषेक दिन दि ६ शुक्रवार आयोजित केला होता.सर्व प्रथम मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पुष्प अर्पण करून पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. नंतर ऑनलाइन टेलिव्हिजन द्वारे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवराज्याभिषेक दिनानिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या व इतर वरिष्ठ मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्यावर प्रकाश टाकला व्हिडिओ व्दारे आनलाईन उद्घाटकन उद्घघाटक देवेंद्र फडणवीस मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र, या अध्यक्षस्थानी प्राचार्य पी.के.अन्नपुर्णे हे होते तर प्रमुख वक्ते डॉ. जयेश तळणकर होते व्यासपीठावर हर्षल गंगाधर महाजन आय एम सी सदस्य प्रा.ईश्वर परडे समाज कल्याण विभागाचे महेंद्र गोणारकर उपस्थित होते.

यावेळी पत्रकार जगदिश जोगदंड प्रा.प्रदिप कदम व अतुल शहाणे यानीं विचार व्यक्त केली. सूत्रसंचालन के.एस. उचके ,आभारप्रदर्शन जी. आर. रेकुलवार यांनी केले या प्रसंगी ए. व्ही मुलगीर, , व्ही. डब्ल्यू नागरे, शिवप्रसाद साकळकर ,गजानन मेहेत्रे, काशीनाथ शेळके ,आसाराम वल्लमवाड ,अतिष सोदागर, रामा भिसे, पत्रकार सतीश टाकळकर, विनायक देसाई, संपत तेली आदीसह विद्यार्थी यांची उपस्थिती होती.



सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया

छोट्या जाहिराती व प्रगटनासाठी

खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/

९४ २३३२४६६६५. ९२८४६६४४३०. ९२८४६९५५८३

# जिंतूरात नानासाहेब राऊत यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य वाटप

## कै.कचरु श्रीपती माघाडे सेवाभावी संस्थेच्यावतीने उपक्रमांचे आयोजन, विद्यार्थी भारावले

**जिंतूर,/प्रतिनिधी-** नानासाहेब राऊत यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप कै.कचरू श्रीपती माघाडे सेवाभावी संस्थेचा उपक्रम करण्यात आला होता.

तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस ( अजितदादा गट ) पार्टीचे नानासाहेब राऊत यांच्या वाढदिवसानिमित्ताने दि.७ जून शनिवार रोजी शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्यालयात वाढदिवसाच्या आयोजनासह शालेय विद्यार्थ्यांना कै. कचरू श्रीपती माघाडे सेवाभावी संस्थेच्यामार्फत वाटप करण्यात आले. अलीकडे वाढदिवस साजरा करण्याचे प्रस्थ मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे.

असे असताना हल्ली केक कापून नको त्या पद्धतीने वाढदिवस साजरा करण्याचे फ्याडही वाढत आहे. मात्र कुठल्याही गोष्टीला उपक्रमशीलतेची जोड देऊन त्यातून नवीन फायदा निर्माण केल्यास तो सर्वांसाठी एक वेगळा आदर्श ठरू शकतो. असाच एक वेगळ्या आदर्शाचा पायंडा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी नेते नानासाहेब राऊत यांच्या वाढदिवसानिमित्ताने कै. कचरू श्रीपती माघाडे सेवाभावी संस्थेच्या वतीने अनुसूचित जमातीच्या शालेय विद्यार्थ्यांना वर्षभर पुरेल असे शैक्षणिक साहित्याचे वाटप करून सामाजिक भान जोपासत आपल्या नेत्याचा वाढदिवस साजरा केला. सदरील साहित्यामध्ये स्कूल बॅग, वर्षभर पुरेल इतक्या वह्या, पेन, पेन्सिल, रबर या सह अनेक शैक्षणिक साहित्य होते. दरम्यान यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष लक्ष्मण दादा बुधवंत, नानासाहेब राऊत, केशव बुधवंत, अविनाश काळे, डॉ. निशांत मुंढेसंजय घुले, दिलीप माघाडे, युवराज घनसावंत कैलास ढाकारे राजू शेळके तुकाराम दुभळकर गजानन घनदारे पांडुरंग दुभळकर मुकुंद डाखोरे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते, कार्यकर्ते व पालकासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते..



## सेलू नगरतील काव्य संगितास वरुणराजाचीही हजेरी

### कविता मिरगाच्या शब्दसह्याद्री व अक्षर प्रतिष्ठानचा उपक्रम



**सेलू,/प्रतिनिधी :** व अक्षर प्रतिष्ठान आणि स्वामी रामानंद तीर्थ हिंदी-मराठी ग्रंथालयाच्या वतीने आयोजित कविता मिरगाच्या काव्य मैफिलीस श्रोत्यांसह वरूणराजानेही हजेरी लावून उत्स्फूर्त दाद दिली. सभागृहाबाहेर मिरगाच्या सरी बरसत होत्या. तर सभागृहात कवींच्या कवितांचा वर्षाव होत होता. ग्रंथालयाच्या सभागृहात शब्दसह्याद्री व अक्षर प्रतिष्ठानच्या कविता मिरगाच्या उपक्रमाची बारावी काव्य मैफिल श्रोत्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात शनिवार ( दि. ०७ ) जून रोजी संपन्न झाली.

काव्य मैफिलीत कवी ललित अधाने यांनी , '' दाही दिशाला दुष्काळ, जीव निघाला कोळून, पुढं दिसतं मरण, होरपळलं जीवन '' या कवितेतून दुष्काळाची दाहकता व्यक्त केली. कवयित्री सारिका उबाळे यांनी, '' भीती वाटते कोणत्याही पुरुषांशी ओळखीचं मनमोकळं हसण्याची, हस्तांदोलन करण्याची, सोशल मीडियावर लाईक, कमेंट करण्याची मॅसेंजरवर वडीलधाऱ्या पुरुषालाही उत्तर देण्याची, वाटत राहते भीती '' ही स्त्री वेदनेची तर प्रिया धारूरकर यांनी, '' कवीनं व्हावं इतकं आत्ममग्न की, सगळी नग्नताच आर्त होत जावी, इतकी की समाजमनाचा वैश्विक हुंकारच उद्गार बनून यावा त्याच्या ठायी, लेखणीतून झरत जावं दुःख, न्यायाच्या शब्दांची ग्वाही देणारं रचावं त्यानी सूक्त, स्वकोशी जाळं फाटत जाताना फुटत रहाव्यात अहंकारी ओळी '' ही कविता सादर करून रसिकांची मने जिंकली. काव्य मैफिलीचे बहारदार सुत्रसंचलन करणारे गझलकार अरविंद सगर यांनी सादर केलेल्या , '' बरेही वाटते काळात या मज पोरगी नाही, कुठे बेमौत मेली तर आता ती काळजी नाही.'' या गझलेने श्रोते भावनिक झाले. तर सुनील उबाळे यांच्या , '' कविता चांगली आहे पोरी फक्त विषय चुकला होता, पोरगी म्हणाली, विषय कितीतरी दिवसांनी चुकला, मॅडम तो पुसण्यासाठी फळा, खडू आणि पुस्तकांशी भांडन सुरू आहे.'' या कवितेने श्रोते आत्ममग्न झाले.

कार्यक्रमात आदर्श शिक्षक माधव गव्हाणे यांचा तर लघुपटास पुरस्कार मिळाल्याबद्दल विजय ढाकणे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. काव्य मैफिलीस शिक्षणाधिकारी विठ्ठल भूसारे, डॉ. दिलीप चव्हाण, गंगाधर गायकवाड, बबन आव्हाड, बाळू बुधवंत यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अशोक पाठक यांनी केले. सुत्रसंचलन डॉ. काशिनाथ पल्लेवाड यांनी केले. तर आभार प्रदर्शन सुभाष मोहकरे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी, मुख्याध्यापक सर्जेराव लहाने यांच्या मार्गदर्शनात चंद्रशेखर मुळावेकर, डॉ. सतीश मगर, डॉ. सुरेश हिवाळे, डॉ. शरद ठाकर, संध्या फुलपगार यांनी पुढाकार घेतला. काव्य मैफिलीस शहरातील साहित्यिक, शिक्षक, प्राध्यापक, विविध क्षेत्रातील श्रोते उपस्थित होते.

### बोरी शिवारात उदमाजंरास वनरक्षकांनी दिले जीवदान

**परभणी,/प्रतिनिधी-** बोरी शिवारात पकडललेले उदमांजर सर्प मित्र आशितोष नितनवरे व अशीष ठोंबरे, केरबाजी चव्हाण मि डेली वीजेस वन मजूर भुजंग बदू राठोड़ जिंतूर आम्ही वनपाल जिंतूर शिंदे यांच्या मार्गदर्शनाने नेमगिरी परिसर वनक्षेत्र येथे सोड़ले त्यास जीवदान वरिल वन्य प्राणी प्रेमी कडून मिळाले असून याकाही परिसरातील नागरिकांनी देखील वनरक्षकास मोलाचे सहकार्य केले होते.



## डॉ.राम रोडगे अध्यापक महाविद्यालयास नॅक ब दर्जा

**सेलू,/प्रतिनिधी:**श्रीराम प्रतिष्ठान संचलित डॉ. राम रोडगे अध्यापक महाविद्यालयास नॅक मूल्यांकनात ब दर्जा प्राप्त झाला आहे. महाविद्यालयाच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ.संजय रोडगे यांचा सत्कार दत्तराव कदम, शुभम खंदारे,महेंद्र गाडे, प्रभाकर इकर, निलेश सोळंके, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रा. महादेव साबळे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मीनाक्षी रत्नपारखी प्रा. डॉ. बबन सोनवणे,प्रगती क्षीरसागर, डॉ. अमृता देशपांडे,नारायण चौरे, प्रा. अशोक बोडके,मनीषा पांगुळे,अर्जुन पवार,आनंद हातोळे,श्रीराम उघडे,मामिता सिंग,भागवत थोरात,पवन पवार,भूषण पामे, बालाजी शिंदे, पांडुरंग काकडे आदींनी या यशामागे अथक परिश्रम घेतले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय रोडगे यांनी सर्व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.



## जन्मभुमीच्या ऋणातून उतराई होण्यासाठी श्रीराम शक्तीपीठाची स्थापना- सोमेश्वरानंद

**सोनपेठ,/प्रतिनिधी :**डघोळ ही माझी जन्मभूमी असुन परीसरातील समाजाचे ऋण फेडण्यासाठी, समाजाला डोळस श्रध्देकडे नेण्यासाठी श्रीराम शक्तीपीठाच्या केंद्राची डिघोळ येथे स्थापना करत असल्याचे महामंडालेश्वर सोमेश्वरानंद सरस्वती महाराज यांनी शक्तीकेंद्राच्या भुमीपूजन प्रसंगी सांगितले.

नाशिक त्र्यंबकेश्वर येथील श्रीराम शक्तीपीठाचे पिठाधीश महामंडलेश्वर श्री सोमेश्वरानंद सरस्वती महाराज यांनी आपल्या जन्मगावी शक्तीपिठाचे केंद्र उभारणीच्या कामास रविवार दि ८ रोजी डिघोळ येथे सुरुवात केली.या शक्ती केंद्राच्या कामाची सुरुवात महाराजांच्या हस्ते करण्यात आली यावेळी महारांजे आई वडील राहीबाई व दातोबा यांच्या सह महंत श्रीनाथानंद सरस्वती व सिध्देश्वरानंद सरस्वती महाराज यांच्या सह ॲड दिपक गवळी, ननवरे महाराज, सुधीर बिंदू, रमाकांत देशमुख,शरद मुळी ,सतीश पारेकर, दत्ता शिगांडे, प्रकाश गायकवाड, महादेव गिरे, बालचंद शिंदे,



हिरामन ढगे रविंद्र परदेशी हे उपस्थित होते.

उपस्थित नागरिकांना मार्गदर्शन करताना श्री सोमेश्वरानंद सरस्वती महाराज यांनी सांगितले की, भोंदु बांबाच्या गंडेदोरे लिंबु धाग्यांच्या अंधश्रद्धेत अडकलेल्या समाजाला डोळस श्रध्देकडे नेण्यासाठी या केंद्राची स्थापना करण्यात येत आहे.समाजाला या केंद्रा मार्फत संविधानासह धर्म शिकवण्यात येईल. त्याच प्रमाणे त्यांनी विज्ञान आणि धर्माच्या सांगडीचा वेळ आला असुन त्या साठी हे केंद्र काम करेल असे ही त्यांनी सांगितले . परीसरातील विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याची गरज असुन त्यासाठी ही काम करण्यात येईल असेही त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अरविंद ननवरे महाराज यांनी केले.त्यावेळी त्यांनी श्रीराम शक्तीपीठाचे कार्य सांगितले. लवकरच या शक्तीकेंद्राची भव्य उभारणी करण्यात येणार असुन हे केंद्र सर्वांनी आपले समजुन काम करण्याचे आवाहन हि त्यांनी केले .या कार्यक्रमाला परीसरातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विकसित कृषि संकल्प अभियान अंतर्गत मौ.रुमना येथे संवाद मेळावा

**गंगाखेड ,/प्रतिनिधी-** कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार आणि भारतीय कृषी अनुसंधान परिषद यांच्या संकल्पनेनुसार विकसित कृषी संकल्प अभियान दि. २९ मे २०२५ ते १२ जून २०२५ या दरम्यान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत कृषी विज्ञान केंद्र परभणी, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी, भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली अंतर्गत येणाऱ्या विविध कृषी संशोधन संस्था, कृषी विभाग आणि आत्मा या विभागातील शास्त्रज्ञ व अधिकारी या कार्यक्रमासाठी उपस्थित राहून खरीप हंगामासाठी आवश्यक नियोजन, आधुनिक कृषी तंत्रज्ञान आणि कृषी विभागाअंतर्गत येणाऱ्या विविध योजनांबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करत आहेत.

या अभियाना अंतर्गत दिनांक ९ जून २०२५ रोजी मौजे. रुमना, ता. गंगाखेड येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी, मौ. रुमना चे सरपंच श्री. परमेश्वर टिकाराम सोळंके तर प्रगतशिल शेतकरी श्री. उध्दव भगवानराव सोळंके हे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे हे पद कृषि विज्ञान केंद्र, परभणी चे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख, डॉ. प्रशांत भोसले यांनी भुषविले. या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणुन डॉ. गजानन गडदे, प्रमुख, कृषि माहिती तंत्रज्ञान केंद्र, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी आणि डॉ. सी. व्ही. आंबाडकर, सहाय्यक प्रध्यापक, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी आणि कृषि विज्ञान केंद्र, परभणीचे शास्त्रज्ञ डॉ. अरुणा खरवडे हे उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रस्तावना सादर करतांना डॉ. प्रशांत भोसले यांनी विकसित कृषि संकल्प अभियानाच्या माध्यमातुन कृषि विज्ञान केंद्र, परभणी मार्फत परभणी जिल्हातील विविध ९०गावामध्ये या अभियानाच्या माध्यमातुन शास्त्रज्ञांच्या भेटी व्दारे असुन या मार्फत शेतकऱ्यांमध्ये खरीपपुर्व तयारी, नवनविन तंत्रज्ञान, शासकीय योजना, शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्याचे तंत्रज्ञान नियोजन करण्यात आले आहे या बद्दल विस्तुत माहिती दिली. तांत्रिक संत्रामध्ये डॉ. गजानन गडदे यांनी खरिप हंगामामध्ये घेण्यात येणाऱ्या कापूस, सोयाबीन, तुर या पिकांचे प्रमुख वाण, पेरणी पध्दत, खतांचे नियोजन तसेच कोरडवाहु लागवड तंत्रज्ञान याबद्दल सविस्तर माहिती दिली. डॉ. चंद्रशेखर अंबाडकर यांनी खरीप पिकातील बिज प्रक्रिया करताना घ्यावयाची काळजी, पिक निहाय बिज प्रक्रिया कशाप्रकारे करावी, खरीप पिकातील किड व रोग व्यवस्थापन तसेच बायोमिक्सचा वापर प्रभावीपणे करण्याबाबत विस्तृत मार्गदर्शन केले.



त्याचप्रमाणे कृषी विभागातील श्री. राजु टकले कृषि सहाय्यक यांनी कृषी विभागाअंतर्गत येणाऱ्या विविध योजनांबद्दल मार्गदर्शन केले आणि श्री. प्रकाश साळुंके, तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक, आत्मा, परभणी यांनी सोयाबीन बियाण्याची उगवण क्षमता याविषयी प्रात्यक्षिक करुन दखविले.

या अभियानाच्या माध्यमातुन शेतकऱ्यांच्या प्रतिक्रिया (फिडबॅक) घेतले जात आहेत. तसेच शेतकऱ्यांच्या अनुभवातून संशोधन तसेच तंत्रज्ञानात आवश्यक त्या सुधारणा करण्यासाठी या अभियानाचा वापर होईल असे प्रतिपादन केले. कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित महाविस्तार ॲपच्या माध्यमातून हवामान अंदाज व सल्ला, पीक लागवड तंत्रज्ञान, बाजारभाव आदी बाबत अधिकृत व व्यवस्थित माहिती शेतकऱ्यांच्या हातात उपलब्ध होणार आहे. त्याकरीता शेतकऱ्यांनी महाविस्तार ॲप डाऊनलोड करावे असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्री. सिध्देश्वर सोळंके यांनी केले या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कृषि विज्ञान केंद्र, परभणी येथील सर्व अधिकरी व कर्मचारी तसेच रुमना गावातील तरुणांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी रुमना या गावातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.